




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १५३ * नांदेड * सोमवार, दि. ९ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा मान यावर्षी साताऱ्याला!

**पुणे (प्रतिनिधी)–** यंदाचे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन तब्बल ३२ वर्षांनंतर साताऱ्यात भरणार आहे. ते आयोजित करण्याचा मान साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फाऊंडेशनला मिळणार आहे. रविवारी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुणे येथे झालेल्या बैठकीत एकमताने हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार साताऱ्यात होणारे हे चौथे साहित्य संमेलन असेल.

या बैठकीला उपाध्यक्ष गुरुय्या स्वामी, कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या सह सर्व घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी स्थळ निवड समिती गठित करण्यात आली होती. ही समिती पाच, सहा आणि सात जून रोजी निमंत्रक संस्थांना भेट देऊन आली.




अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी यंदा ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होणार असल्याचे सांगितले.ते म्हणाले, साताऱ्याला ३२ वर्षांनंतर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मान मिळालाय. यापूर्वी १९९३ साली विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात संमेलन झाले होते. गेल्या बारा वर्षांपासून महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाहूपुरी शाखा साताऱ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाची संधी मिळावी यासाठी पाठपुरावा करत होती.

सातारा येथील छत्रपती शाहू स्टेडीअमवर ही संमेलन भरवले जाणार आहे. या ठिकाणीच १९९३ साली ६६वे संमेलन झाले होते. छत्रपती शाहू स्टेडियम १४ एकरात असून तिथे मुख्य मंडप, २ इतर मंडप, ग्रंथ प्रदर्शन, कवी गझल कट्टा, तसेच भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. इतर छोटे कार्यक्रम करण्यासाठी ३ सभागृहे उपलब्ध आहेत. स्टेडियममध्ये २५,००० प्रेक्षक क्षमता असलेली गॅलरी आहे. हे स्टेडियम सातारा बस स्थानकापासून पायी चालत जाण्याच्या अंतरावर असून शहराच्या मध्यभागी असल्याने शहरातील आणि बाहेरून येणाऱ्या साहित्य रसिकांची सोय होणार आहे.

या संमेलनासाठी मार्गदर्शन समिती गठीत करण्यात आली असून त्यात प्रा मिलिंद जोशी, गुरय्या स्वामी, सुनिता राजे पवार, विनोद कुलकर्णी, प्रदीप दाते, दादा गोरे आणि डॉ उज्ज्वला मेहेंदळे यांचा समावेश आहे.

## मणिपूरमध्ये पुन्हा दंगल; पाच दिवस इंटरनेट, मोबाईल नेटवर्क बंद

**इंफाळ (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय तपास संस्थेने अर्थात एनआयएने मैतेई ग्रुप आरंबाई टेंगोलच्या पाच जणांना अटक केली आहे. यातील एक स्थानिक स्वयंघोषीत कमांडर आहे. ही अटक होणार याचा अंदाज येताच मणिपूरच्या काही भागांमध्ये दंगल करायला सुरुवात झाली. पण सर्वत्र चोख बंदोबस्तामुळे आरोपींना पलायन करणे जमले नाही. अखेर रविवारी रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास पाचही जणांना अटक करण्यात आली. या अटकेनंतर दंगल आणखी भडकली. दंगलीची तीव्रता वाढू नये म्हणून इंफाळ पश्चिम, इंफाळ पूर्व, थोबुल, बिशनपूर, काकचिंग या पाच जिल्ह्यांमध्ये पाच दिवस इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्क बंद करण्यात आले आहे.

रात्री भडकलेल्या दंगलीचे पडसाद आंतरराष्ट्रीय सीमेजवळच्या मोरेह पर्यंत दिसून आले. हिंसा आणखी पसरू नये म्हणून सर्वत्र दंगल प्रभावीत सर्व भागांमध्ये संचारबंदी अर्थात कर्फ्यू लागू करण्यात आली आहे. संपूर्ण बिष्णुपुर जिल्ह्यातही संचारबंदी आहे. दंगल करणाऱ्यांनी अटकेतील पाच जणांच्या सुटकेची मागणी करत क्वाकीथेल आणि उरीपोक येथे रस्त्यांवर टायर आणि जुने फर्निचर जाळले. जमाव मोठा असल्याचा आणि वाढत असल्याचा अंदाज येताच सुरक्षा पथकाने हवेत गोळीबार केला. गर्दी हटत नसल्याचे बघून दंगल आटोक्यात आणण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट गोळ्यांचा वापर करण्याचा निर्णय झाला आणि जमावाच्या दिशेने गोळीबार करण्यात आला.

## नारी शक्तीच्या कामगिरीने संपूर्ण देशाचा अभिमान वाढवला –पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आपल्या माता-भगिनी-कन्यांनी प्रत्येक टप्प्यावर आव्हानांना सामोरं जावं लागणारा काळ पाहिला आहे. पण आज, त्या केवळ विकसित भारत घडवण्याच्या संकल्पात सक्रिय भागच घेत नाहीत, तर शिक्षणापासून उद्योजकतेपर्यंत प्रत्येक क्षेत्रात नवीन मानदंडही प्रस्थापित करत आहेत. मागील ११ वर्षांत, आपल्या नारी शक्तीच्या कामगिरीने संपूर्ण देशाचा अभिमान वाढवला आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले.

पंतप्रधानांनी एक्स या सामाजिक माध्यमांवरील पोस्ट मालिकेद्वारे टिप्पण केले आहे. मोदी यांनी गेल्या ११ वर्षात महिलांच्या नेतृत्वाखालील विकासावर सरकारचे लक्ष अधोरेखित करून विकसित भारताच्या प्रवासात महिलांनी बजावलेल्या परिवर्तनकारी भूमिकेवर प्रकाश टाकला आहे.

पंतप्रधान म्हणाले की, एनडीए सरकारने प्रभावी उपक्रमांच्या माध्यमातून महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाची पुनर्व्याख्या केली आहे, असे पंतप्रधानांनी नमूद केले. स्वच्छ भारत अभियानाद्वारे सन्मानाची खात्री देणे, जनधन खात्यांद्वारे आर्थिक समावेश आणि तळागाळातील सक्षमीकरण यांचा समावेश



आहे. उज्वला योजनेचे उदाहरण देत त्यांनी अनेक घरांमध्ये धुरमुक्त स्वयंपाकघरे आणणारा एक मैलाचा दगड म्हणून उल्लेख केला. मुद्रा कर्ज योजनेमुळे लाखो महिला उद्योजक झाल्या असून, त्यांची स्वप्ने पूर्ण करू शकल्या आहेत, हे देखील त्यांनी अधोरेखित केले. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महिलांच्या नावावर घरे देण्याने त्यांच्या सुरक्षिततेच्या आणि सक्षमीकरणाच्या भावनेवर उल्लेखनीय परिणाम झाला आहे.

पंतप्रधानांनी बेटी बचाओ बेटी पढाओ मोहिमेची आठवण काढत ही चळवळ मुलींच्या संरक्षणासाठी एक राष्ट्रीय चळवळ असल्याचा उल्लेख केला. मोदी म्हणाले की, विज्ञान, शिक्षण, खेळ, स्टार्टअप्स आणि सशस्त्र दलांसह सर्व क्षेत्रांमध्ये महिला उत्कृष्ट कामगिरी करत आहेत आणि अनेकांना प्रेरणा देत आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज सर्किट विशेष ट्रेनचा आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासन आणि भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी), आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनगौरवाचा अनुभव देण्यासाठी एक विशेष पर्यटक ट्रेन 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किटची घोषणा केली आहे. ही भारत गौरव टुरिस्ट ट्रेन दि.०९ जून २०२५ पासून सुरू होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज सर्किट अंतर्गत भारत गौरव ट्रेनला आज दि. ९ जून रोजी सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल, प्लॅटफॉर्म क्रमांक १८, मुंबई येथे हिरवा झेंडा दाखवून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, अजित पवार, पर्यटन मंत्री शंभुराज देसाई व पर्यटन राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत तरी पर्यटकांनी याचा अनुभव घ्यावा असे आवाहन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले आहे.

भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ महाराष्ट्र शासनाशी समन्वय साधून, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे या गौरवशाली ट्रेनचे हे आगमन महाराष्ट्राच्या संस्कृतीचे भव्य दर्शन घडवणारे ठरेल. भारत गौरव ट्रेन ज्या-ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहीती पर्यटकांना देण्यात येणार आहे. दि.०९ जुन २०२५ रोजी पासून सुरु होणारी ट्रेन पुर्णत: आरक्षित झाली असून पर्यटकांची चांगली पसंती दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहासाच्या या सहलीमुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला एक वेगळा आयाम मिळणार आहे. या उत्साही यात्रेत सहभागी होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वसा उचलावा, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगावा, आणि नव्या पिढीला या इतिहासाचे दर्शन घडवावे, असे आवाहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे. या उपक्रमासाठी महामंडळाचे सर्व अधिकारी समन्वय आणि परीश्रम करीत असून, छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकिल्ले, महाराष्ट्राची समृद्ध परंपरा आणि लोकसंस्कृती सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी महामंडळ सतत प्रयत्नशील आहे.

## आसाममध्ये ३.३७ लाख नागरिकांना पुराचा तडाखा, २३ मृत्यू

**दिसपूर (प्रतिनिधी)–** आसामच्या १२ जिल्ह्यांमध्ये पुराता तडाखा बसला आहे. याठिकाणचे सुमारे ३.३७ लाख नागरिक अजूनही पुराच्या विळख्यात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

आसाम सरकारच्या अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत पुर आणि भूस्खलनामुळे एकूण २३ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ६ जण भूस्खलनात मरण पावले आहेत. राज्यातील श्रीभूम सर्वाधिक पूरप्रभावित भाग असून, १.९३ लाखांहून अधिक लोक तिथे पुराच्या विळख्यात आहेत. इतर प्रभावित



जिल्ह्यांमध्ये हैलाकांडी येथील ७३७२४ तर कछार येथील ५६३९८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. राज्यात एकूण ३३७३५८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. तर ४१ सर्कल व ९९९ गावे प्रभावित झाली आहेत. राज्यातील ३६ हजारांहून अधिक नागरिकांनी १३३ मदत छावण्यांमध्ये आश्रय घेतला आहे. तर ६८ मदत वितरण केंद्रांतून गरजूंना मदत पोहचवली जात आहे. राज्यात पुरामुळे १२६५९ हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे.

तर राज्याच्या २ जिल्ह्यांमध्ये शहरी पूरामुळे २८४ लोक प्रभावित आहेत. तसेच काझीरंगा नॅशनल पार्क व पोबितोरा वन्यजीव अभयारण्य अजूनही पाण्याखाली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

ब्रह्मपुत्रा नदीसह प्रमुख नद्यांचा पूर सध्या ओसरत असला तरी काही नद्या अजूनही धोक्याच्या पातळीवर आहेत. धुब्री येथे ब्रह्मपुत्रा, धरमटुल येथे कोपिली, बीपी घाट येथे बराक, आणि श्रीभूमी येथे कुशियारा धोक्याच्या पातळीवर वाहत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## विठ्ठल-रुक्मिणीचे २७ जूनपासून मिळणार २४ तास दर्शन

**सोलापूर (प्रतिनिधी)–** आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. या आषाढीयात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना मंदिर समितीमार्फत मुबलक सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच भाविकांचे सुलभ व जलद दर्शन व्हावे, यासाठी दि. २७ जूनपासून २४ तास दर्शन व्यवस्था उपलब्ध होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीची बैठक सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली.

## बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणातील मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना २५ लाखांची मदत

**मुंबई (प्रतिनिधी)–** बंगळुरूच्या एम.चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या दुर्देवी घटनेनंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धारमैया यांनी मोठी घोषणा केली आहे. त्यांनी या दुर्घटनेतील मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना दिल्या जाणाऱ्या मदतीच्या रकमेत वाढ करण्याचे आदेश दिले आहे. आता १० लाख नाही तर २५ लाखांची मदत केली जाणार आहे.

याआधी राज्य सरकारने १० लाख रूपये मदत निधीची घोषणा केली होती मात्र घटनेचे गांभीर्य पाहता मुख्यमंत्र्यांनी ही रक्कम वाढवण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री सिद्धारमैया यांनी अधिकाऱ्यांना आदेश दिलेत की मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना तात्काळ मदत केली जावी यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या दिलासा मिळेल.

आरसीबीच्या संघाने १८ वर्षानंतर पहिल्यांदा आयपीएलची ट्रॉफी जिंकली होती. यामुळे या विजयाचे सेलीब्रेशन करण्यासाठी स्टेडियममध्ये तुफान गर्दी झाली होती. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार सेलिब्रेशनदरम्यान स्टेडियमबाहेर आणि आत अचानक गर्दीवरील नियंत्रण सुटले. यामुळे चेंगराचेंगरी झाली आणि या दुर्घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला. तर अनेकजण जखमी झाले होते.

## लोणावळ्यातील भुशी डॅममध्ये बुडून दोन तरूणांचा मृत्यू

**लोणावळा (प्रतिनिधी)–** पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणाऱ्या लोणावळ्यातील भुशी डॅममध्ये बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, साहिल अश्रफ अली शेख आणि मोहम्मद जमाल अशी बुडून मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत.दोन्हीही तरुण उत्तर प्रदेशातील असून कामानिमित्त लोणावळ्यात राहत होते. रविवारी सुट्टी असल्याने लोणावळ्यात राहणाऱ्या तरुणांचा ग्रुप भुशी डॅम परिसरात फिरायला गेला होता. त्यावेळी ही घटना घडली.

## देशभरात कोरोनाचे ६,१३३ रुग्ण, २४ तासांत ६ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशात पुन्हा एकदा कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होऊ लागली आहे. यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या देशभरात कोरोना विषाणूचे ६,१३३ सक्रिय रुग्ण असून, ६,२३७ रुग्णांनी संसर्गावर मात केली आहे. तसेच गेल्या २४ तासांत देशात ६ जणांचा कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाने मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. सध्या कोरोनाने मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या कमी जरी असली, तरी दिवसागणिक वाढणारे सक्रिय रुग्ण कोरोना महामारीबद्दल चिंता वाढवत आहेत.

कोरोनाच्या वाढत्या प्रकरणांमुळे केंद्र सरकारने सर्व राज्यांना सतर्क राहण्यास, आणि आवश्यक उपाययोजना त्वरित राबवण्यास सांगितले आहे.

राष्ट्रीय राजधानी दिल्लीमध्येही कोरोनाचे प्रमाण वाढत असून ६६५ सक्रिय प्रकरणांची नोंद झाली आहे. तर, केरळमध्ये ३, कर्नाटकमध्ये २ आणि तामिळनाडूमध्ये १ रुग्णाचा मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये केरळमधील तिघांचे वय अनुक्रमे ५१, ६४ आणि ९२ वर्षे होते. कर्नाटकमधील दोन पुरुष रुग्ण ४६ आणि ७८ वर्षांचे, तर तामिळनाडूतील रुग्ण ४२ वर्षांचा होता. विशेष म्हणजे, गेल्या २४ तासांत मृत्युमुखी पडलेले सर्व रुग्ण पुरुष होते. जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत देशभरात कोरोनामुळे एकूण ६१ मृत्यू झाले आहेत. एकट्या दिल्लीमध्येच यावर्षी आतापर्यंत ७ जणांनी प्राण गमावले आहेत.

## भाजपाची मंडळ समिती राहणार ६१ सदस्यांची!

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्षाच्या ५० प्राथमिक सदस्यांची नोंदणी करणारा सक्रिय सदस्य हा फंडा वापरून घराघरात पोहोचणाऱ्या भाजपाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता संघटनात्मक दृष्टीने सुद्धा वेगळा प्रयोग हाती घेतला आहे. नुकत्याच निवडण्यात आलेल्या मंडळ अध्यक्षाच्या मंडळ समितीत अध्यक्षासह तब्बल ६१ जणांचा समावेश करण्याबाबत राज्यातील सर्व मंडळ अध्यक्षांना सूचना देण्यात आल्या आहेत. भाजपाने बूथ प्रमुख, बूथ समित्या, शक्ती केंद्रप्रमुख, मंडळ अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष यांच्या निवडीसाठी राज्यभर संघटनात्मक निवडणुकीचा कार्यक्रम लावला. वय वर्ष ४५ पेक्षा जास्त असणारा मंडळ अध्यक्ष नको, तर ४५ वर्षांपेक्षा कमी वय असलेला जिल्हाध्यक्ष नको अशी आचार संहिता मंडळ अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष निवडीसाठी लावून दिली. आणि अपवादात्मक परिस्थिती सोडता राज्यात बहुतांश ठिकाणी ती यशस्वीपणे राबविण्यात आली. एससी, एसटीच्या नागरिकांना प्राधान्य, महिलांना प्राधान्य देण्याबाबत सुद्धा बूथ समितीपासून तर प्रदेश परिषद सदस्य निवडण्याच्या सर्व प्रक्रियेत ही बाब प्रामुख्याने राबविण्यासाठी सूचना देण्यात आल्या.

भाजपाची ५० सदस्य नोंदणी करणारा भाजपाचा सक्रिय सदस्य असेल आणि सक्रिय सदस्याला पक्षात मानाचे स्थान राहील ही बाब सर्वत्र रुजवून भाजपाने जिल्हा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी केली आहे. त्यानंतर मंडळात असलेल्या एकूण बूथ पैकी ५१ टक्के बूथ समित्यांची रचना करण्यात आली आहे. बूथ समित्यांमध्ये सुद्धा बारा सदस्यांपैकी तीन महिला असणे अनिवार्य करण्यात आले होते. त्याचप्रमाणे एससी एसटी प्रवर्गाला प्राधान्य देण्याबाबतही सूचना देण्यात आल्या होत्या. एकंदरीतच समाजातील प्रत्येक घटकाला भाजपासोबत जोडण्याचे काम करण्यात येत असताना, आता राज्यात होऊ घातलेल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मोर्चे बांधणी सुद्धा संघटनात्मक शक्ती वाढविण्याच्या माध्यमातून केली जात आहे.

प्रत्येक मंडळामध्ये ४५ कार्यकारणी सदस्यांसह २ सरचिटणीस, ६ उपाध्यक्ष, ६ सचिव आणि १ कोषाध्यक्ष अशा प्रकारे ६० आणि मंडळ अध्यक्ष धरून ६१ जणांची मंडळ समिती राहणार आहे. मंडळात येणाऱ्या प्रत्येक भागातील घटकांचा मंडळ समितीमध्ये समावेश करण्याबाबत, तसेच महिला व एससी एसटीच्या प्रवर्गातील नागरिकांना प्राधान्य देण्याचे काम या समितीमध्ये सुद्धा करण्यात येणार आहे. लवकरच होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपाकडून अशाप्रकारे ग्राउंड लेव्हलवर मोर्चे बांधणी करण्यात येत आहे.

## राहुल गांधींच्या लेखाला देवेंद्र फडणवीसांकडून लेखानेच प्रत्युत्तर

**मुंबई (प्रतिनिधी)–** २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका या लोकशाही यंत्रणेमध्ये हेराफेरी करण्यासाठी तयार केलेला मॅच फिक्सिंगचा आराखडा होता. आता हेच प्रकार बिहारमध्येही होणार आहे. भाजपला जिथे जिथे हार पत्करावी लागते तिथे अशा प्रकारची गैरकृत्ये केली जातात, अशी घणाघाती टीका लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. राहुल गांधी यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात लिहिलेला 'मॅच फिक्सिंग महाराष्ट्र' हा लेख एक्स प्लॅटफॉर्मवर शेअर केला. त्यात त्यांनी गंभीर आरोप केले. राहुल गांधींच्या या आरोपावर आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखानेच प्रत्युत्तर दिले आहे.

२०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांत मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झाले होते, पण त्यानंतरही हे आकडे वाढत गेले. मतदानाची अंतिम टक्केवारी ६६.०५ टक्के असल्याचे



दुसऱ्या दिवशी सकाळी सांगण्यात आले. म्हणजे या मतांमध्ये ७.८३ टक्क्यांची वाढ झाली. राज्यातील केवळ १२००० बूथमध्ये नव्या मतदारांची भर पडली. त्यातील ८५ मतदारसंत भाजपला विजय मिळाला होता, असा दावा राहुल गांधींनी केला. यावर देखील देवेंद्र फडणवीसांनी उत्तर दिलं आहे. शेवटच्या तासात मतदान वाढलेल्या जागी एनडीए जिंकली म्हणणे हास्यास्पद आहे. कामठीचे उदाहरण त्यांनी दिले. पण जे उदाहरण त्यांनी दिले नाही, ते मी येथे देतो आहे. माढ्यात शेवटच्या तासात १८ टक्के मतदान झाले, तिथं शरद पवार गटाचा उमेदवार जिंकला. वणीत शेवटच्या तासात १३ टक्के मतदान झाले, तिथे उद्धव ठाकरे गटाचा उमेदवार जिंकला आणि श्रीरामपूरमध्ये १२ टक्के मतदान झाले, तिथं काँग्रेस विजयी झाली, असं देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले.

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाबाबत काही पुरावे उपस्थित केले आहेत. निवडणूक आयोग त्यांना नक्कीच उत्तर देईल. पण मुख्य मुद्दा म्हणजे लोकशाही प्रक्रियेचा आणि लोकांच्या जनादेशाचा सतत होणारा अपमान... जनतेने राहुल गांधींना नाकारले आहे आणि सूड म्हणून ते जनतेला आणि त्यांच्या जनादेशाला नाकारत आहेत. यामुळे काँग्रेस पक्ष आणखी अडचणीत येईल. त्यांच्याच पक्षाचे आमदार एका दिवसात कोणालाही भेटण्याची वेळ मिळावी असे आव्हान देणारी विधाने का करतात याचे त्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे. लोकशाही प्रक्रिया आणि संवैधानिक संस्थांबद्दल सतत शंका उपस्थित करून ते देशाला कोणत्या दिशेने घेऊन जात आहेत आणि कोणते विष पसरवत आहेत याची त्यांना जाणीव असली पाहिजे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

काँग्रेसच्या काळात निवडणूक आयुक्त सरकारने थेटपणे निवडले. २६ पैकी २५ निवडणूक आयुक्त काँग्रेस सरकारने थेट निवडले. २०१४ ते २०१९ दरम्यान देशभर ६३ लाख मतदार वाढले. २०१९ ते २०२४ दरम्यान देशभर ७५ लाख मतदार वाढले. तर २००४ ते २००९ दरम्यान देशभर १ कोटी मतदार वाढल्याचे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. २०२४ मध्ये मतदारसंख्या वाढीत काहीही असाधारण नाही, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## शेळ्या सोडण्यावरून मुलानेच केला बापाचा खून




**नांदेड (प्रतिनिधी)–** शेळ्या सोडण्याच्या कारणावरून मुलानेच बापाचा खून केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरदडा ता. मुदखेड येथे घराच्या बाजूला असलेल्या गायरानामध्ये गोविंद सावडा जाधव (वय ७५, रा. वरदडा तांडा) हे शेळ्या चारण्यासाठी घेऊन गेले होते. यावेळी त्यांचा मुलगा संतोष गोविंद जाधव याने शेळ्या का सोडल्या या कारणावरून त्यांना मारहाण करून खून केल्याची घटना दि. ६ जून रोजी घडली. याप्रकरणी परसराम रामजी पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोउपनि एस. एस. शिंदे पुढील तपास करत आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# बांगलादेशातील संधिसाधू संघर्ष

बांगलादेशात सध्या जे राजकीय चित्र उभं राहिलं आहे, ते केवळ अस्थिरतेचं नाही, तर लोकशाहीच्या अस्तित्वालाही गंभीर आव्हान देणारं आहे. काही महिन्यांपूर्वीपर्यंत देशाच्या पंतप्रधानपदी असलेल्या शेख हसीना यांना देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागल्याची घटना अत्यंत चिंताजनक आहे. आरक्षणाच्या प्रश्नावरून विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केलं आणि त्या आंदोलनाचा विस्तार इतका झाला की, सत्ताधारी पक्ष अवामी लीगवर बंदी आणली गेली. हे लोकशाही राष्ट्रात घडूच कसं शकतं? हसीना यांच्या अनुपस्थितीत, लष्कराने नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांना देशाच्या हंगामी सरकारचा सल्लागार म्हणून नेमलं. देशात सुरू असलेलं अराजक, काम बंद आंदोलनं, शासकीय धोरणांविरोधातील निदर्शने यामुळे राजकीय आणि सामाजिक व्यवस्थाच कोसळल्याचं स्पष्ट होतं. युनूस यांना जबाबदारी देण्यात आली खरी, पण त्यांनी ती योग्य प्रकारे पार पाडली आहे का, हा मोठा प्रश्न आहे. सत्तेवर येताच त्यांच्यातील कट्टरपंथीय जागा झाला आणि त्यांनी दहशतवादासारखे कृत्य करायला सुरुवात केली. कारण युनूस यांचं सत्तेत आगमन हे निवडणुकीद्वारे झालेलं नसून, लष्करी नेमणुकीद्वारे झालं आहे. त्यामुळे त्यांच्या भूमिकेची वैधता, नैतिकताही तपासणं गरजेचं ठरतं. ते देशाचे केवळ सल्लागार आहेत, पण सध्या ते निर्णयकर्त्यांच्या भूमिकेत वागत आहेत. त्यांच्या निर्णयांमध्ये भारतविरोधी झुकाव स्पष्ट जाणवतो. एवढ्यावरच न राहता त्यांनी चीनला आमंत्रण देऊन भारतामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी बांगलादेशा जवळ लष्करी तळ स्थापन करण्याची परवानगी दिली आहे. शेख हसीना यांच्या काळात भारत आणि बांगलादेश यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते, परंतु युनूस यांच्या नेतत्त्वाखाली चीनशी जवळीक साधण्याचे प्रयत्न दिसून येत आहेत. ही घडामोड भारतासाठीही गंभीर आहे. अवामी लीग हा देशातील सर्वात मोठा पक्ष असून, त्यावर थेट बंदी घालणे म्हणजेच लोकशाही प्रक्रियेवर अघोषित आपत्ती आणण्यासारखं आहे. कोणता पक्ष निवडायचा याचा निर्णय हा मतदारांचा असतो, लष्कराचा किंवा सल्लागाराचा नाही. बांगलादेशातील जनता ही हसीना यांना व त्यांच्या पक्षाला अनेक वेळा निवडून देणारी आहे. मग अचानकपणे असा पक्षच अराजकीय ठरवणं ही केवळ मनमानी नाही, तर ती लोकशाही व्यवस्थेची गळचेपी ठरते. दुसरीकडे, युनूस यांनी निवडणुका पुढे ढकलण्यासाठी वेळेचे कारण दिले असले तरी यामागे सत्तेची लालसा दिसून येते. वास्तविक, बांगलादेशच्या राज्यघटनेनुसार सरकार कोसळल्यानंतर तीन महिन्यांच्या आत निवडणुका घेणं बंधनकारक आहे. आता या मुदतीला नऊ महिने उलटून गेले आहेत. परिणामी, युनूस यांच्यावर जनतेचा रोष वाढतो आहे. या परिस्थितीत, लष्करप्रमुख वकार-उझ-जमान यांनी थेट हस्तक्षेप करत डिसेंबरपर्यंत निवडणुका घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. याचा अर्थ असा की, युनूस यांचं सल्लागारपद केवळ तात्पुरतं असून, त्याचा विस्तार करण्याचा कोणताही अधिकार त्यांच्याकडे नाही. जर त्यांना देशाच्या भवितव्यात सक्रिय भूमिका घ्यायची असेल, तर त्यांनी नव्याने निवडणूक लढवावी आणि जनतेचा विश्वास मिळवावा अन्यथा तटस्थ सल्लागार म्हणून मर्यादेत राहणं, हीच योग्य भूमिका ठरेल. सध्या बांगलादेशात सरकारी कर्मचारी, शिक्षक, व्यापारी, सर्वच स्तरांमध्ये असंतोष आहे. आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारही बांगलादेश सोडून व्हीएतनामसारख्या पर्यायी बाजाराकडे वळले आहेत. यामुळे देशाची अर्थव्यवस्था कोलमडण्याची शक्यता आहे. विशेषतः वस्त्रोद्योग, जो बांगलादेशची ओळख ठरतो, तोही धोक्यात आला आहे. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर चीन आणि पाकिस्तानसारख्या भारतविरोधी देशांच्या वाढत्या हस्तक्षेपाची शक्यता झपाट्याने वाढत आहे. बीएनपी आणि जमाते इस्लामीसारखे पक्ष पुन्हा सक्रिय होत असून, हे पक्ष पाकिस्तानधार्जिणे आहेत. यामुळे भारताच्या सुरक्षिततेवरही प्रत्यक्ष परिणाम होऊ शकतो. तसेच युनुषांच्या सक्षम नेतृत्वाखाली बांगलादेशातील हिंदूंना संपवण्याचा उपक्रम आताही चालूच आहे. बांगलादेशातील परिस्थितीचा भारताने गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. चीनचं राजकीय, आर्थिक, आणि कधीमधी लष्करी बांगलादेशात वाढत चाललेलं स्थान, हे भारताच्या 'पहिला शेजारी' धोरणाला आव्हान देणारे आहे. त्यामुळे भारताने आपल्या संबंधांची पुनर्पुष्टी करत, बांगलादेशातील लोकशाहीवादी शक्तींना स्पष्ट पाठिंबा देणं गरजेचं आहे. बांगलादेशाला सशक्त, पारदर्शक आणि लोकशाही निवडणुकांची नितांत गरज आहे. सत्ताधाऱ्यांनी, असो ते हंगामी की निवडून आलेले, देशाच्या भवितव्यासाठी तटस्थता आणि जनतेच्या मताचा आदर राखणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, बांगलादेश एका नव्या राजकीय अंधाराकडे वाटचाल करेल, ज्याचा धोका केवळ त्यांच्यापुरता मर्यादित राहणार नाही, तर संपूर्ण उपखंडात अस्थिरता निर्माण करू शकतो, हे कोणीही नाकारू शकत नाही.

# शिवरायांचा संस्कृत संवर्धनाचा वसा

**तिथीनुसार यावर्षी शिवराज्याभिषेक महोत्सव ६ ते ९ जून या काळात साजरा होत आहे. यानिमित्त, छत्रपती शिवाजी महाराजांनी संस्कृत भाषेच्या संवर्धनासाठी केलेल्या कार्याचा परिचय करून देणारा हा लेख.**
**– संपादक**

जगाच्या इतिहासात काही थोर नेते केवळ भूभागाचे राज्यकर्ते नव्हते, तर ते संस्कृतीचे आधारस्तंभ ठरले. महाराष्ट्राच्या मातीतील असा एक तेजस्वी तारा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. स्वराज्याच्या स्थापनेसाठी त्यांनी युध्द केलं, किल्ले जिंकले, मोगल-सुलतानांशी टक्कर घेतली. पण त्यासोबतच त्यांनी संस्कृती आणि संस्कृत भाषा संगोपनासाठीही किती प्रयत्न केले, हे आपल्या काळात फारच कमी लोकांना ज्ञात आहे. विशेषतः संस्कृत भाषेच्या पुनरुत्थानासाठी महाराजांनी जे प्रयत्न केले, ते आजच्या शिक्षणप्रणाली आणि भाषानितीला दिशादर्शक ठरू शकतात.

सन १७ शतकात फारसी, उर्दू, अरबी या परकीय भाषा राजकारभारात रूढ होत्या. मराठी आणि संस्कृत या मूळ भाषांचा प्रभाव झपाट्याने लुप्त होत होता. अशा काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी राजकारभारात आणि सांस्कृतिक जीवनात संस्कृत भाषेचे पुनरागमन घडवून आणले. ही केवळ भाषिक नव्हे, तर सांस्कृतिक पुनर्जागरणाची क्रांती होती.

**शिवरायांची राजभाषा धोरणं**

शिवाजी महाराजांच्या काळात त्यांनी अनेक महत्त्वाचे ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिण्याची प्रेरणा दिली. 'राज्यव्यवहारकोश', 'करणकौस्तुभ', 'शिव-भारतम्', 'शिवार्कोदय' हे असे काही ग्रंथ आहेत जे संस्कृत भाषेच्या विकासासाठी त्याकाळात रचले गेले. विशेष म्हणजे राज्यव्यवहारकोश या ग्रंथात फारसी, उर्दू आणि अरबीतील प्रशासकीय शब्दांना संस्कृतमूळ पर्याय देण्यात आला. हे कार्य पंडित रघुनाथ हणमंते यांनी छत्रपतींच्या प्रेरणेतून केलं.

**राजमुद्रा व संस्कृत प्रेम**

**शिवाजी महाराजांची राजमुद्रा हीसुद्धा संस्कृत भाषेत होती :**
प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते।

या एका मुद्रेतून शिवाजी महाराजांचे संस्कृतावरील प्रेम, परंपरेचे भान आणि राष्ट्रनिर्मितीची दृष्टी स्पष्टपणे जाणवते. शिवरायांचे राजपत्र मराठीत असले



तरी त्याचा समारोप 'मर्यादेयं विराजते' अशा संस्कृत वाक्याने होई, हे विशेष लक्षणीय आहे.

**छत्रपती संभाजी महाराजांचे संस्कृत शिक्षण**

शिवरायांनी स्वत:चे पुत्र संभाजी राजांना संस्कृत शिकण्यासाठी उमाजी पंडितांची नेमणूक केली. यामुळे संभाजी राजांनी 'बुधभूषणम्' हा संस्कृत काव्यग्रंथ लिहिला. या कृतीतून एका राजा-पुरुषाने संस्कृत शिक्षण केवळ दिखावा म्हणून नव्हे तर गंभीरतेने घेतल्याचे दिसते. शिवरायांनी पद्धतशीर संस्कृत अभ्यासासाठी युवा नेतृत्व घडवले, हे त्यांच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहे.

**वैदिक राजाभिषेक आणि नवीन ग्रंथनिर्मिती**

शिवरायांचा राजाभिषेक हा पूर्णतः वैदिक पद्धतीने झाला. गागाभट्ट यांच्याकडून त्यांनी 'शिवराजाभिषेकप्रयोग' नावाचा वैदिक ग्रंथ लिहवून घेतला. तसेच गागाभट्टाला 'शिवार्कोदय', 'समयनय', 'कायस्थधर्मप्रदीप' असे ग्रंथ रचण्याची आज्ञा दिली. यातून शिवरायांचा संस्कृतशास्त्रातील गाढा अभ्यास आणि त्यावरील विश्वास अधोरेखित होतो.

**संस्कृतमय स्थापत्य आणि शिलालेख**

केवळ भाषेपुरतेच मर्यादित न राहता छत्रपती शिवाजी महाराजांनी संस्कृत भाषेतील शिलालेख स्थापत्यामध्ये कोरले. सप्तकोटीश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करून तिथे संस्कृत शिलालेख बसवणे, नारवे गावातील देवालयाचा नवा शिलालेख, तसेच रायगडावरील जगदीश्वर मंदिराचा विस्तृत संस्कृत शिलालेख हे याचे उत्तम उदाहरण.

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददो ऽनुज्ञया श्रीमच्छत्रपतेः शिवस्य नृपतेः सिंहासने तिष्ठतः । शाके षण्णव-बाण-भूमिगणनादानन्दसंवत्सरे ज्योतीराजमुहूर्तकीर्तिमहिते शुक्लेशसार्पे तिथौ ।। १ ।।

या कोरीव अक्षरांमध्ये महाराजांची भाषा-परंपरेप्रती असलेली निष्ठा व वास्तुशिल्पाची कलात्मक जाण यांचा संगम आहे.

'क्षत्रियकुलावतंसः शिवछत्रपतिः महाराजः सिंहासनाधिश्वरः' संस्कृतमध्येच असलेली महाराजांची ही बिरुदावली महाराजांची संस्कृत प्रेम सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

**भारतीय पदनामांची पुनर्स्थापना**

राजाभिषेकानंतर अष्टप्रधान मंडळाच्या सदस्यांसाठी असलेली परकीय भाषेतील पदनावे त्यांनी बदलून भारतीय परंपरेनुसार संस्कृतनिष्ठ केली. हे भाषिक स्वातंत्र्याचे पहिले पाऊल होते.

**आजच्या काळासाठी प्रेरणा**

संस्कृत केवळ प्राचीन ज्ञानाचे भांडार नाही, तर भारतीय संस्कृतीचा मेरुदंड आहे. शिवाजी महाराजांनी हे ओळखून १७ व्या शतकात संस्कृतचे पुनरुत्थान घडवले. आज जेव्हा आपल्याकडे भाषिक गुलामगिरीचे विविध रूप पाहायला मिळते, तेव्हा शिवरायांच्या धोरणांचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था यामध्ये भारतीय भाषांना आणि संस्कृतसारख्या तत्त्वज्ञानसमृद्ध भाषेला स्थान दिल्यास खरी 'संस्कृतीनिष्ठ स्वराज्य' संकल्पना साकार होईल.

शिवरायांचा शिवराजाभिषेक महोत्सव केवळ ऐतिहासिक आठवण नसून, तो संस्कृती आणि भाषेच्या पुनरुज्जीवनाचा एक दीपस्तंभ आहे. या दीपस्तंभाचे तेज पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणे, हेच खरे शिवजयंतीचे सार्थ स्मरण ठरेल.

**–प्रा. सु. ग. जाधव**
नांदेड
मो. ९४२३१४०७४१

# जननायक बिरसा मुंडा



आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता.

१८७८ – ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही.

१८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला.

१८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले.

बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली.

बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# मान्सून आणि जलसंग्रह : पावसाच्या पाण्याचे महत्त्व

मान्सून येऊन दाखल झाला आहे! बंगळुरू आणि मुंबईसह अनेक शहरांमध्ये मान्सूनपूर्व पावसाची मोठी बरसात झाली आहे. यंदा मान्सून पाऊस १०६ टक्के बरसणार असल्याची बातमी सगळ्यांनाच आनंद देऊन गेली आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे, आणि कोणत्याही कृषिप्रधान देशासाठी मान्सूनच्या काळात होणारा पाऊस अत्यंत महत्त्वाचा असतो. आजही भारतीय शेतकऱ्यांचा मोठा वर्ग सिंचनासाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. आज जेव्हा जगातील मोठ्या लोकसंख्येला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा मिळत नाही, तेव्हा पावसाचे नक्कीच स्वागत केले पाहिजे. मान्सून आपल्याला पावसाच्या पाण्याचा साठा करण्याची संधी देतो, जेणेकरून भविष्यासाठी त्या मौल्यवान संपत्तीचा संग्रह करता येईल. याबद्दल रहीमने फार पूर्वीच म्हटले आहे, रहिमन पानी राखिये, बिन पानी सब सून।

मान्सूनचे स्वागत म्हणजे काय तर... आपण पावसाच्या पाण्याचा योग्य वापर आणि संरक्षण याबाबत जागरूक असावे आणि आवश्यक तयारी ठेवावी. खरं तर, देशातील प्रति व्यक्ती पाण्याच्या उपलब्धतेचे आकडे पाहिले, तर पावसाच्या पाण्याचे संरक्षण का गरजेचे आहे हे समजते. काही काळापूर्वी राज्यसभेत सांगितले गेले की, एका अभ्यासानुसार २०२१ मध्ये भारतात सरासरी प्रति व्यक्ती वार्षिक पाण्याची उपलब्धता १३८६ घनमीटर होती, तर २०३१ साठी ही उपलब्धता १३८७ घनमीटर राहण्याचा अंदाज आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे, कारण १७०० घनमीटरपेक्षा कमी वार्षिक प्रति व्यक्ती पाण्याची उपलब्धता ही जलसंकटाची स्थिती मानली जाते. त्यातच भारतात पाण्याचे वितरण असमान आहे. काही भागांमध्ये नेहमीच पाण्याची उपलब्धता असते, तर काही ठिकाणी, विशेषतः उन्हाळ्यात, गरजेच्या पाण्यासाठी हिंसक संघर्षाची वेळ येते. याचे कारण म्हणजे भारतातील जलस्रोतांची परिस्थिती एकसमान नाही.

आकडेवारी सांगते की, भारतातील सुमारे ७१ टक्के जलस्रोत देशाच्या ३६ टक्के भागात केंद्रित आहेत, तर उरलेल्या ६४ टक्के भागात फक्त २९ टक्के जलस्रोत उपलब्ध आहेत. म्हणजेच, देशाच्या मोठ्या भागाला आपल्या पाण्याच्या गरजांसाठी जलसंग्रहाची गरज आहे. अशा परिस्थितीत व्यर्थ वाहून जाणारे पावसाचे पाणी जर साठवले गेले, तर लोकसंख्येच्या मोठ्या भागाला जलसंकटामुळे होणाऱ्या अडचणींपासून वाचवता येईल. भारतात सरासरी वार्षिक पर्जन्य ११५ इंच आहे, पण या पावसाचे वितरण देशाच्या वेगवेगळ्या भागांत समान नाही. विशेष म्हणजे, सुमारे ८.६ कोटी



हेक्टरमधील भारतीय शेती ही सिंचनासाठी पावसावर अवलंबून आहे.

पूर्वी गावांमध्ये, शहरांमध्ये आणि खेड्यांमध्ये पावसाचे पाणी साठवण्यासाठी तलाव, सरोवरे, विहिरी, बावडी, कुंड आणि जोहड बांधले जात. हे जलस्रोत केवळ पावसाचे पाणी साठवून वर्षभर गरजेचे पाणी पुरवत नसत, तर भूजल पातळी राखण्यासही मदत करत. या जलस्रोतांचा सामाजिक उपयोग खूप होता, त्यामुळे त्यांचे बांधकाम पुण्याचे कार्य मानले जायचे. सधन व्यक्ती विशेष प्रसंगी असे जलस्रोत बांधत. राजस्थानच्या बूंदी जिल्ह्यातील हिंडोली गावातील एका तलावाची कथा खूप रंजक आहे. एका बंजाऱ्याच्या मुलीचे लग्न या गावात झाले होते. त्या काळात बंजारे फिरून व्यापार करत आणि खूप संपन्न असत. एकदा कोणत्या तरी कारणाने नाराज झालेल्या त्या मुलीला तिच्या सासूने टोमणा मारला, इथे तुझ्या बापाने पाण्याची इतकी सोय करून ठेवली आहे का, की तू इतके पाणी वाया घालतेस? ही गोष्ट त्या बंजाऱ्याला समजली, तेव्हा तो आपल्या ताफ्यासह हिंडोलीला आला आणि तिथे तलाव खणूनच परत गेला!

बावड्या आणि कुंड हे केवळ पाणी साठवण्यासाठीच नव्हे, तर त्या काळातील स्थापत्यकलेची समृद्धीही दाखवत. गुजरातमधील राणी की बावडी ही तिच्या स्थापत्यामुळे प्रसिद्ध आहे आणि दूरदूरचे पर्यटक ती पाहण्यासाठी येतात. जुन्या किल्ल्यांमध्ये तर तलावांमध्येही बावड्या आणि विहिरी बांधल्या जात, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत साठवलेल्या पावसाच्या पाण्यामुळे पाण्याची कमतरता भासू नये. मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरजवळील नरवर किल्ल्याचा इतिहास नल-दमयंतीच्या कथेशी जोडला गेला आहे. या किल्ल्यात राजा नलच्या महालाबाहेर एक विशाल तलाव आहे, आणि या तलावात आठ विहिरी आणि नऊ बावड्या आहेत.

कालांतराने जुने जलस्रोत उपेक्षेचे बळी ठरले. बहुतेक प्राचीन जलाशय हे पावसाच्या पाण्याच्या प्रवाहाच्या मार्गात असत, जिथे पावसाचे पाणी वाहून येऊन साठत असे. पश्चिम राजस्थानात तर अशी यंत्रणा विकसित होती की, एक तलाव भरल्यानंतर पाणी दुसऱ्या तलावाकडे वाहून जाई. पावसाच्या पाण्याच्या संग्रहाबाबत या भागातील लोक किती जागरूक होते, याचा अंदाज जैसलमेरच्या गढसीसर तलावाच्या उदाहरणावरून येतो. पावसापूर्वी लोक श्रमदान करून या तलावाची स्वच्छता करत. स्वतः शासकही यात श्रमदान करत. पहिल्या पावसानंतर या सुंदर तलावात आंघोळीवर बंदी असे, जेणेकरून पाणी खराब होऊ नये. संपूर्ण भागात पावसाच्या पाण्याचा संग्रह आणि त्याची शुद्धता राखण्याची प्रथा होती. पण जेव्हापासून नळाद्वारे घरोघरी पाणी पोहोचू लागले, तेव्हापासून लोक या प्राचीन जलस्रोतांकडे उदासीन झाले. देशातील बहुतेक तलाव वस्त्यांसाठी आणि कुंड व्यावसायिक आस्थापनांसाठी भरले गेले. लोकांनी कचरा टाकून बावड्या आणि विहिरी निरुपयोगी केल्या.

जुन्या जलस्रोतांच्या मार्गात नवीन वस्त्या किंवा बांधकामे आल्याने एक तोटा असा झाला की, थोड्याशा पावसाने वस्त्यांमध्ये जलसाठ्याची परिस्थिती निर्माण होते. महानगरांमध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे नवीन वस्त्यांचे बांधकाम ही शहरी व्यवस्थापनाची गरज मानली जाऊ शकते, पण देशातील छोट्या शहरांमध्येही किरकोळ पावसामुळे पूरस्थिती निर्माण होते. याचे एक मोठे कारण म्हणजे, शहरांच्या भौगोलिक परिस्थितीला अनुसरून पावसाच्या पाण्याचा प्रवाह साठवण्यासाठी जुन्या काळात बांधलेले जलस्रोत एकतर उपेक्षेमुळे नष्ट झाले किंवा अतिक्रमणाचे बळी ठरले.

चंबळ नदीच्या किनारी वसलेल्या राजस्थानच्या कोटा शहरातील अनेक वस्त्यांमधील भूजल पातळी याच कारणाने वेगाने खालावली आहे. अस्सीच्या दशकाच्या शेवटी एका धोरणांतर्गत प्रत्येक वस्तीत पाणी पोहोचवण्याच्या हेतूने अनेक नलकूप खणले गेले. आपण जमिनीतील पाणी आपल्या सुखासाठी वापरण्याचे धोरण तर बनवले, पण भूजल पातळी राखण्यासाठी उपायांवर गांभीर्याने विचार केला नाही. परिणामी, भारतातील बहुतांश भागांत भूजल झपाट्याने कमी होत आहे. जेव्हा स्वच्छ पाण्याची उपलब्धता संपूर्ण मानवजातीसाठी मोठी आव्हान बनत आहे, तेव्हा आता गरज आहे की आपण पावसाच्या पाण्याच्या संग्रह आणि संरक्षणाबाबत जागरूक होऊ!

**–मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# आरबीएलतर्फे विद्यार्थिनींना सायकल व शालेय साहित्याचे वितरण

**नागपूर**–महिला सक्षमीकरणात शिक्षण हा अत्यंत मोलाचा घटक असून यासाठी मुलींना प्रोत्साहित करणाऱ्या अनेक योजना राज्य शासनातर्फे राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आरबीएलच्या उम्मीद उपक्रमाअंतर्गत गरजू विद्यार्थिनींना सायकल व शालेय साहित्याचे वितरण हा उपक्रम प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. आरबीएल बँकेतर्फे उम्मीद या समाजसेवी (सीएसआर) उपक्रमाअंतर्गत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विद्यार्थिनींना सायकल व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच धन्वंतरी आरोग्य शिबिराचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले.

आमदार संदीप जोशी, प्रवीण दटके, आरबीएलचे कोषाध्यक्ष अशोक चांडक व संचालक मंडळाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मनीष नगर परिसरात आयोजित कार्यक्रमात आज उपस्थितांच्या हस्ते १०० सायकलींचे वाटप करण्यात आले. मुख्यमंत्री म्हणाले, मुलींच्या शिक्षणातीतील एक मोठा अडथळा म्हणजे त्यासाठी करावा लागणारा लांब पल्ल्याचा प्रवास हा आहे. आरबीएलतर्फे वितरीत करण्यात येणाऱ्या सायकलींमुळे विद्यार्थिनींना शाळेत जाणे सुलभ होण्यासह उपस्थितीत सातत्य राखण्यासाठी मदत होत आहे. विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी याची अधिक मदत होत आहे.

समाजातील गरजू व वंचित विद्यार्थिनींच्या शैक्षणिक समस्यांची जाणीव ठेवून आरबीएल आपली सामाजिक जबाबदारी पार पाडत आहे. हे अत्यंत स्तुत्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, आरबीएलतर्फे दरवर्षी विविध उपक्रम राबविण्यात येतात. धन्वंतरी आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून डोळे तपासणी, चष्मे वाटप तसेच इतर तपासण्या नि:शुल्क करण्यात येत आहेत. मुलींचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी याचा निश्चितच उपयोग होईल.

नुकतेच गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील कवंडे या गावी विद्यार्थिनींना सायकलवाटप करण्यात आले. त्यावेळी विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील आनंद बघून समाधान लाभल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे अत्याधुनिक सुविधा व साधनांपासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थिनींचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होईल. आरबीएलने भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करावे अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. आरबीएलचे कोषाध्यक्ष अंशुल चांडक यांनी प्रास्ताविक करताना, यावर्षी १८०० सायकलींचे वितरण करण्यात येणार असून मागील वर्षी ४८०० सायकली विद्यार्थिनींना देण्यात आल्याचे सांगितले. समाजसेवी (सीएसआर) उपक्रमाअंतर्गत चालवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. परिसरातील नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात...

### शिक्षकांच्या निवृत्तीविषयक तक्रारींसाठी उद्या जिल्हा परिषदेत पेंशन अदालत

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या तसेच आगामी सहा महिन्यांत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीविषयक तक्रारी, अडचणी तसेच शंका दूर करण्यासाठी पेंशन अदालत होणार आहे. ही पेंशन अदालत मंगळवार दि. १० जून रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडणार आहे. यामध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या तक्रारी प्रत्यक्ष ऐकून घेऊन तत्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे. या उपक्रमातून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन, अडचणींचे निराकरण तसेच निवृत्तीवेतन प्रक्रियेत सुसूत्रता मिळणार असून, याचा सर्व संबंधितांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) राजकुमार मुक्कावार यांनी केले आहे.

### वसतिगृह प्रवेश प्रक्रियेला १० जूनपासून सुरूवात

**नांदेड (प्रतिनिधी)–** मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतिगृहात २०२५-२६ साठी विद्यार्थ्यांना वसतिगृहात माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदवीत्तर या विद्यार्थ्यांचे पुनर / नूतन प्रवेशासाठी प्रवेश अर्ज मागविण्यात आली आहेत. या वसतिगृहात दि. १० जूनपासून प्रवेश अर्ज स्विकारले जाणार आहेत. या अर्जासोबत शेवटी दिलेल्या वार्षिक परीक्षेतील गुणपत्रक, सन २०२४-२५ या वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार यांनी अदा केलेले आसावे) व चालू वर्षात (२०२५-२६ साठी) प्रवेश घेतलेले बोनाफाईड प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, यांच्या सत्यप्रति संक्षांकित करुण प्रवेशा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

# शिबिरार्थींना जंगलभ्रमण, रुग्णालय व वृध्दाश्रमातून शाश्वत विकासाचे धडे



**किनवट (प्रतिनिधी) –** भारत जोडो युवा अकादमीच्यावतीने साने गुरुजी एमर्जन्सी व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये सुरू असलेल्या राष्ट्र सेवा दलाचे विज्ञान, साहस व छंद शिबीर सुरु आहे. या शिबिरात तालुक्यातील अनेक गावांतील १२५ शिबिरार्थींनी गुरुवारी शाश्वत विकासाच्या विविध अंगांचा अभ्यासमूलक अनुभव घेतला.

शिबीरार्थींनी सर्वप्रथम राजगड वन परीक्षेत्रातील वन विभाग कार्यालयाला भेट दिली. प्रमुख वनपाल जी. एन. कापसे आणि एच. बी. चौधरी यांनी शिबीरार्थींना जंगल व्यवस्थापन, वनस्पतींचे प्रकार, औषधी वनस्पती, वन्यप्राणी व दुर्मीळ जैवविविधतेची माहिती दिली. जंगलातील संभाव्य धोके, त्यावरील उपाययोजना आणि जंगल संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. यानंतर जंगलभ्रमंतीत शिबीरार्थींना प्रियदर्शिनी विमानतळ परिसरात मार्गदर्शन करण्यात आले.

यानंतर शिबीरार्थींनी साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्राला भेट दिली. वैद्यकीय संचालक डॉ. योगेंद्र वरटकर, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर, डॉ. अशोक बेलखोडे यांच्यासोबत संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध वैद्यकीय विभागाला भेटी दिल्या. रुग्णांशी संवाद साधला. रुग्णालयात राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती घेतली. सामाजिक कार्यकर्ते विकास बोलेणवार यांनी रुग्णांसाठी उपलब्ध योजना व सेवांचे सविस्तर मार्गदर्शन केले. या भेटीत विद्यार्थ्यांनी आम्हीही डॉक्टर होऊन समाजसेवेसाठी काम करू, अशी प्रेरणा व्यक्त केली.

त्यानंतर शिबिरार्थींनी किनवट येथील संस्थागार वृध्दाश्रमाला भेट दिली. वृध्दांशी संवाद साधताना त्यांच्या आयुष्यातील संघर्ष आणि सध्याच्या गरजा समजून घेतल्या. अनेक शिबिरार्थी भावूक झाले. काहींच्या डोळ्यांत अश्रूही तरळले. या अनुभवातून प्रेरणा घेत, आमच्या आजी-आजोबांना, आई-वडिलांना वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येऊ देणार नाही, अशी शपथ शिबिरार्थींनी घेतली.

या अभ्यासदौऱ्यासाठी राष्ट्र सेवा दलाचे पूर्णवेळ कार्यकर्ते सदाशिव मकदूम, सीमा सरपोतदार, सामाजिक वनीकरण विभागाचे सुनील खामकर, प्रा. डॉ. सुनील व्यवहारे, शिक्षक राम भुसमवार, डॉ. शिवाजी गायकवाड, नीतीन टारपे, संजय बोलेणवार, कल्पना तोडसाम, नागेश देवतळे, विपीन पवार तसेच समाजकार्य प्रशिक्षणार्थी नेहा आडे, प्रेमचंद बसी, रामदास सलाम, राजनंदिनी पडवाळ व प्रियांका कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

# किनवट मतदारसंघाचा सर्वांगिण विकास हाच ध्यास -आ.भीमराव केराम




**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगिण विकास हाच आपला ध्यास आहे. गेल्या ५ वर्षांपासून विकासकामांचा ओघ सुरू असून, तो असाच कायम राहील, अशी ग्वाही आमदार भीमराव केराम यांनी दिली.

किनवट शहरात तब्बल ९ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन बुधवारी दि. ४ आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. आ. केराम म्हणाले की, किनवट हे आधुनिक नागरी सुविधांनी परिपूर्ण शहर म्हणून विकसित व्हावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. गेली साडे पाच वर्षे आमदार म्हणून काम करताना मी मतदार संघाचा विकास करण्यावरच भर दिला आहे. या पुढेही मतदार संघाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आपले प्रयत्न सातत्याने सुरूच राहतील, असेही ते म्हणाले. यावेळी पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे, स्थापत्य अभियंता सूरज साकळे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, दिनकरराव चाडावार, माजी उपाध्यक्ष अनिल तिरमनवार, व्यंकट नेम्मानीवार, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार, माजी उपाध्यक्ष, अजय चाडावार, श्रीनिवास यादवराव नेम्मानीवार, ॲड.रमण जायभाये, ॲड. माज बडगुजर, विश्वास कोल्हारीकर, धीरज नेम्मानीवार, कृष्णा इटकेपेल्लीवार, जय वर्मा, राजेंद्र भातनासे, सतीश बिराजदार, हाजी हबीब चव्हाण, बाळकृष्ण कदम, बालाजी धोतरे, कृष्णा कलकुंटलवार, सुगत नगराळे, जगदीश तिरमनवार, निखिल कावळे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, अभि. राहुल नाईक, अभि. मामीलवाड, कंत्राटदार व्यंकट माडपेल्लीवार, निसार भाटी, गंगुबाई परेकार यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# चार वेगवेगळ्या ठिकाणी घरफोड्या; लाखोंचा ऐवज लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी चार घरफोडीच्या घटना घडल्या. हदगाव, हिमायतनगर, नांदेड शहरातील तेहरानगर आणि मुखेड येथे घरफोडी करून चोरट्यांनी लाखोंचा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिमायतनगर येथील गजानन विजय जिदेवार यांचे सनई येथील घर चोरट्यांनी शुक्रवारी दुपारी दीडच्या सुमारास आरोपी शेख अफरोज, सोनु देवसरकर आणि त्यांच्यासोबत ८ ते १० जणांनी त्यांना मारहणा केली. तसेच गळ्यातील ५ ग्रॅम सोन्याची चैन ४० हजार रुपये किंमतीची आणि दोन मोबाईल फोडले. गजानन जिदेवार यांचा फिर्यादीवरून हिमायतनगर पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक नामदेव मद्दे करत आहेत.

हदगाव शहरातील ग्रीन पार्क कॉलनीतील अंजली उत्तमराव माने यांचे बंद घर शुक्रवारी सकाळी फोडले. चोरट्यांनी २ लाख ६९ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिणे व रोख ५ हजार ५०० रुपये रोख रक्कम असा एकूण २ लाख ७४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. हदगाव पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरिक्षक रायबोळे तपास करत आहेत.

नांदेड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तेहरानगर येथील अश्विनी मिलिंद जाधव यांचे घर चोरट्यांनीगुरुवारी सायंकाळी बंद घर फोडले. नगदी पन्नास हजार रुपये व इतर साहित्य असा ६० हजारांचा ऐवज लंपास केला. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार शिरसाठ करत आहेत. विशेष म्हणजे या गुन्ह्यात पोलिसांनी तत्परता दाखवत गुन्हा उघडकीस आणला असून चोरट्यास अटक केली आहे व त्याच्याकडून मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच चौथ्या घटनेत मुखेड तालुक्यातील देवला तांडा येथील शिवाजी गोविंद राठोड यांचे घर गुरुवारी रात्री गावातील आरोपी बालाजी रामकिशन भोसले आणि एक अल्पवयीन बालक यांनी फोडून सोन्या-चांदीच्या दागिने असा ७० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. मुखेड पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस अंमलदार कदम करत आहेत.

# संपुर्ण कार्यक्षमतेने व ग्राहककेंद्रित काम करणे काळाची गरज -मुख्य अभियंता माने

### महावितरणचा २० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरणचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी थकबाकी वसुलीसह गुणवत्तापुर्ण ग्राहक सेवा प्राधान्याने द्यावी लागेल. त्यासाठी सर्व जनमित्र, अभियंते यांनी जोमाने काम करावे लागणार आहे, असे प्रतिपादन महावितरणचे मुख्य अभियंता राजाराम माने यांनी केले.

महावितरण नांदेड परिमंडळात महावितरणचा २० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महावितरणच्या कर्मचारी, अधिकारी व त्यांच्या कुटुंबांसाठी कुसुम सभागृहात आयोजित 'ऊर्जा तरंग' स्नेह संमेलन उत्साहात पार पडला.

राजाराम माने म्हणाले की, मागील चार-पाच वर्षात महावितरणने माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्राहक सेवेत मोठी क्रांती केली आहे. वीजक्षेत्रातील स्पर्धेला तोंड द्यायचे असेल तर प्रत्येक महिना हा मार्च महिना समजून संपुर्ण कार्यक्षमतेने कार्यरत राहणे ही काळाची गरज झालेली आहे, असे ते म्हणाले.

महावितरणच्या २० वर्धापन दिनानिमित्त १ ते ६ जून दरम्यान विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. त्याचा समारोप शुकवारी करण्यात आला. प्रारंभी विद्युत भवन येथे शुक्रवारी सकाळी विद्युत सुरक्षेची शपथ घेण्यात आली. याप्रसंगी महावितरणचे प्रमोद देशमुख लिखित व निर्देशित 'मीना' नाटकाचे सादरीकरण झाले. त्यानंतर दीपक देशपांडे यांचे 'हास्य कल्लोळ' सादर झाले. महावितरणचे अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या पाल्या करिता विविध कला गुण दर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रम यशश्वीतेसाठी सर्व अभियंते, मानव संसाधन, लेखा, माहिती तंत्रज्ञान विभागातील अधिकाऱ्यांसह जनमित्रांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेंद्र पाटील तर सुत्रसंचालन श्रीमती किरण देशमूख, श्रीमती कविता कांबळे, प्रमोद देशमुख, राजकुमार सिदगीकर यांनी केले. तर मिलिंद कांबळे यांनी आभार मानले.

# शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर शिक्षण मंत्री भुसे यांच्याशी शिक्षक आमदार अभ्यंकर यांची चर्चा

**लोहा (प्रतिनिधी)–** शिक्षक आमदार ज.मो. अभ्यंकर यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्यासोबत दि. ४ जून रोजी मंत्रालयात शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व शालेय शिक्षण प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव तुषार महाजन, 'एससीईआरटी' चे संचालक राहुल रेखावार यांची प्रमुख उपस्थिती होती, अशी माहिती शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठू चव्हाण यांनी दिली आहे.

शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या सोबत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर यांची शिक्षकांच्या विविध प्रलंबीत प्रश्न यात टप्प्यावरील अनुदानित शाळांना अनुदान, मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांचे मुंबईतच समायोजन, नववी व दहावी विद्यार्थी संख्या ४० ला तीन शिक्षक मान्यता, १५ मार्च २०२४ संच मान्यता शासन निर्णय रद्द करणे, वस्ती शाळांमध्ये काम केलेल्या शिक्षकांची सेवा वरिष्ठ श्रेणी व सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारात घेणे, समग्र शिक्षा अभियान कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यासाठी गठित समितीच्या कार्यास गती देणे, निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षण विषयी आलेल्या तक्रारी १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या पण डीसीपीएस अथवा एनपीएसमध्ये खाती न उघडलेल्या कर्मचाऱ्यांना नव्याने खाती उघडण्याची कार्यपद्धती घोषीत करणे आदी बाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीला शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीकांत देशपांडे, व इतर संघटनांचे पदाधिकारी, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना राज्य कार्याध्यक्ष जालिंदर सरोदे, राज्य सरचिटणीस रमेश चौगुले, प्रकाश शेळके, राज्य समन्वयक नितीन चौधरी, महिला आघाडी अध्यक्ष श्रीम मानसी चाळके, ज्युनियर कॉलेज युनिट अध्यक्ष विशाल बावा, महिला आघाडी अध्यक्ष श्रीमती अनुश्री घोगळे, मासरे आदींची उपस्थिती होती.

शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सकारात्मक दृष्टिकोण ठेवून संबंधित मंत्रालय अधिकाऱ्यांसोबत योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासित केले असल्याची माहिती शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठू चव्हाण यांनी दिली.

# नांदेड विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सेटलमेंट कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी) –** येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय येथे करण्यात नांदेड विभागातील कार्मिक विभागातर्फे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सेटलमेंट कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात एकूण १५ कर्मचाऱ्यांचा सेटलमेंट पूर्ण करण्यात आले. यामध्ये १२ कर्मचारी नियमानुसार सेवानिवृत्त झाले असून ३ कर्मचारी अन्य कारणांमुळे मे महिन्यात सेवानिवृत्त झाले होते.

कार्यक्रमादरम्यान सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या पेन्शन प्राधान्य आदेश (पीपीओ) (PPO), सेवा प्रमाणपत्र, सुवर्णपदक आणि सेटलमेंट कागदपत्रे सौजन्यपूर्वक प्रदान करण्यात आली. सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे ग्रॅच्युइटी, लीव्ह एन्कॅशमेंट, विमा आदी सेटलमेंट देयके थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये दि. ३१ मे २०२५ रोजी जमा करण्यात आले आहेत.

या कार्यक्रमात सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना सन्मानित करण्यात आले व त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

सहायक कार्मिक अधिकारी कुमोद कुमार यांच्या हस्ते निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन प्राधान्य आदेश, सेवा प्रमाणपत्र, सुवर्णपदक आणि सेटलमेंट कागदपत्रे देण्यात आली.

# नरसी शहरात बकरी ईद उत्साहात साजरी




**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नरसी येथे बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आला. ईदगाह मैदानावर बकरी ईदनिमित्त मुस्लिम बांधवांनी सामूदायिक नमाज पठण केले. यावेळी मुस्लिम बांधवांच्या वतीने देशाच्या सुख-शांती व समृध्दीसाठी प्रार्थना करण्यात आली.

नरसी येथील ईदगाह मैदान येथे शनिवारी दि.७ जून रोजी सकाळी ९ वाजता मुस्लिम समाज बांधवांनी सामूदायिक नमाज पठण केले. ईदच्या नमाजनंतर एकमेकांची गळाभेट घेऊन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप, पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे, नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे, प्रकाश पाटील भिलवंडे, सरपंच गजानन पाटील भिलवंडे सह हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

ईद पठण होत असताना कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी श्रीधर जगताप यांनी पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सि. जे. सोनकांबळे, संजय शिंदे, रुद्रावाड यांच्यासह चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# महायुती सरकारने निवडणुकीतील आश्वासनांची पूर्तता करावी -तालुकाप्रमुख संतोष कल्याणकर



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना (उबाठा) गटाचे तालुका प्रमुख संतोष कल्याणकर यांनी प्रशासनाला दिला आहे. यावेळी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवण्यात आले.

निवेदनानुसार, महायुती सरकारने विधानसभा निवडणूकीत दिलेले आश्वासने पूर्ण करावी. शेतकरी कर्जमूक्त करावेत, लाडक्या बहिणींना २१०० रुपये महिना द्यावा, एक रूपयात पिक विमा, शेती साहित्यावरची जीएसटी रद्द करावी, आश्वासनांची निवेदनात आठवण करून देण्यात आली. यावेळी शहर प्रमुख काजी सल्लावोद्दीन, अमोल बारसे, शेतकरी सेना तालुकाप्रमुख रमेश क्षीरसागर, उपतालुकाप्रमुख अशोक डांगे, उपतालुकाप्रमुख सुनिल बोबडे, शेख रफिक, माजी सरपंच प्रतिनिधी कपिल दुधमल, मारोती मोगरकर, विभाग प्रमुख गजानन गव्हाणे, दत्ता भरकड, नागोराव ढगे, ओमप्रकाश नागलमे, कॉंग्रेसचे शेख मकसुद यांच्या सह्या आहेत. यावेळी अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस शहर पवार गटाची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंदर्भात बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने माजी राज्यमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली रविवारी बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी संदर्भात विचार विनिमय करण्यात आला.



पक्षाच्या जिल्हा कार्यालयात रविवारी आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर होते. या बैठकीमध्ये जिल्ह्यातील तालुका निहाय घेण्यात येणाऱ्या बैठकांच्या तारखा निश्चित करण्यात आल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम, केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील, माजी मंत्री डॉ, माधवराव किन्हाळकर, जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील काही प्रमुख पदाधिकाऱ्यांसमवेत बैठकीत विचार विनिमय करून प्रत्येक तालुका स्तरावर बैठका व जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल निहाय बैठका घेण्याच्या संदर्भात कार्यक्रम निश्चित करण्यात आला. जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, शहराध्यक्ष यांच्यासोबत सविस्तरपणे लवकरच बैठक घेण्याचे ठरविण्यात आले. त्याचा सविस्तर तपशील लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

या बैठकीला जिल्हा उपाध्यक्ष सुभाष गायकवाड, जिल्हा सरचिटणीस प्रा. डी. बी. जांभरुणकर, जिल्हा महिला अध्यक्ष प्रांजली रावणगावकर, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष शिवकुमार देवकते, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष प्रा. मजरुद्दीन, ज्येष्ठ नागरिक सेलचे जिल्हाध्यक्ष विश्वंभर भोसीकर, जिल्हा उपाध्यक्ष व नायगाव तालुक्याचे अध्यक्ष पांडुरंग शिंदे, कंधार लोहा विधानसभा अध्यक्ष शिवप्रसाद धोंडगे, जिल्हा उपाध्यक्ष जीवनराव वडजे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष रावणगावकर, हदगाव तालुका अध्यक्ष वसंतराव देशमुख, जिल्हा सरचिटणीस बालाजीराव इंगळे, भोकर विधानसभा अध्यक्ष सुभाषराव कोळगाकर, लोहा शहराध्यक्ष रमेश चव्हाण, जिल्हा सरचिटणीस बालासाहेब मादसवाड उपस्थित होते.

# बीज प्रक्रिया करुनच बियाण्यांची पेरणी करावी; विकसित कृषी संकल्प अभियानाचा दहावा दिवस

**नांदेड (प्रतिनिधी) –** विकसित कृषि संकल्प अभियानाच्या दहाव्या दिवशी बीजप्रक्रियेचे महत्त्व आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगावर भर देण्यात आला. तज्ज्ञांच्या मते, कापूस लागवड करण्यासाठी संकरीत बियाणे आणि योग्य बीजप्रक्रिया अत्यंत आवश्यक असून त्याद्वारे उत्पादनवाढ, मातीची गुणवत्ता सुधारणा आणि कीड व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊ शकते. त्यामुळे बीज प्रक्रिया करुनच बियाण्यांची पेरणी करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

देगलूर तालुक्यातील शहापूर, चेनपुर, करेमालकपुर व मुखेड तालुक्यातील सेवादास नगर, भगनुर्वाडी, शिकरा या गावांमध्ये कार्यक्रम घेण्यात आले. ड्रोन तंत्रज्ञान, अचूक सिंचन प्रणाली, संकरीत बियाणे आणि कीड व्यवस्थापनासाठी नेमका उपाय यासारख्या आधुनिक संकल्पनांवर सखोल चर्चा झाली.

विशेषतः बीजप्रक्रियेचे फायदे, सुधारित बियाण्यांची निवड आणि त्यांचा प्रभावी वापर याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले बीजप्रक्रिया केल्याने बियाण्यांची उगम क्षमता वाढते, रोगप्रतिकारशक्ती सुधारते आणि पीक अधिक निरोगी होते.

यावेळी राष्ट्रीय डाळिंब संशोधन संस्था, सोलापूरचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शिरगुरे, शास्त्रज्ञ डमाळे, ऊस संशोधन संस्था, प्रवरानगरचे डॉ. थोरात व डॉ.बोरसे तसेच कृषी विज्ञान केंद्राचे डॉ.कपिल इंगळे, डॉ.प्रियंका खोले, व्यंकट शिंदे तसेच प्रशांत शिवपणोर, बालाजी चांदापुरे व संतोष लोखंडे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी, कृषी तज्ज्ञ आणि स्थानिक अधिकारी उपस्थित होते.

# प्रगतीमंत्र

# अभियांत्रिकी प्रवेश : आता तीन नव्हे चार 'कॅप' फेऱ्या!

**राज्यातील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये आता तीनऐवजी चार प्रवेश फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या नव्या नियमावलीची अंमलबजावणी होत आहे. प्रवेशासाठी महाविद्यालय पसंतीमध्येही यंदा बदल केला जाणार असून पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचे प्रवेशासाठी दिलेले प्राधान्यक्रम अनुक्रमे एक, तीन आणि सहा महाविद्यालय असे असणार आहे. याबरोबरच व्यवस्थापन कोट्यातून भरणाऱ्या जागांचे अर्ज सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध होणार असून, या कोट्यातील होणारे प्रवेशही संस्थांना मेरिटनुसारच भरावे लागणार आहेत.**



अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या आतापर्यंत तीन फेऱ्या राबविल्या जायच्या. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या अभ्यासक्रमांच्या चार फेऱ्या राबविण्यात



येणार आहेत. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी पात्र असलेल्या उमेदवाराने भरलेल्या पर्यायी अर्जामध्ये बदल करण्याची सुविधा मिळणार आहे. मागील फेऱ्यांमध्ये पर्यायी अर्ज भरण्यात अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांना या चौथ्या फेरीमध्ये पर्यायी अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. कॅप फेऱ्यांची संख्या वाढवून आता चौथी कॅप फेरी समाविष्ट करण्यात आली आहे. यापूर्वी तीन फेऱ्यांनंतर प्रवेश प्रक्रिया संपुष्टात येत होती. आता चौथ्या फेरीअंती प्रवेश अंतिम करण्यात येणार असून, दुसऱ्या फेरीनंतर अभ्यासक्रमांचा प्रवेश अंतिम ठरणार आहे. आतापर्यंतच्या मर्यादित फेऱ्यांमुळे अनेक विद्यार्थ्यांना खासगी किंवा व्यवस्थापन कोट्यातील महागड्या प्रवेशांचा पर्याय स्वीकारावा लागत होता. चौथ्या फेरीमुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### प्राधान्यक्रमानुसार महाविद्यालय निवडणे महत्त्वाचे...

- पहिल्या फेरीत : जर विद्यार्थ्याला त्याच्या पहिल्या पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला, तर त्याला तो तत्काळ निश्चित करावा लागेल.
- दुसऱ्या फेरीत : जर त्याला पहिल्या तीन पसंतीपैकी एक महाविद्यालय मिळाले, तर प्रवेश घेणे अनिवार्य असेल; अन्यथा पुढील फेऱ्यांसाठी अपात्र ठरविले जाईल.
- तिसऱ्या फेरीत : जर विद्यार्थ्याला पहिल्या सहा पसंतीपैकी कोणतेही महाविद्यालय मिळाले, तर त्याला प्रवेश घ्यावाच लागेल.

### व्यवस्थापन कोटा होणार आता पारदर्शक

व्यवस्थापन कोट्यातील उपलब्ध जागांची संपूर्ण माहिती महाविद्यालयांना संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सीईटी कक्षाच्या पोर्टलवरूनही या जागांसाठी अर्ज करता येणार आहे. ही सुविधा यंदा केली आहे. तसेच थेट संस्थेकडे जाऊनही हे अर्ज करता येतील. मात्र, हे प्रवेश पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर होतील. शुल्क नियामक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार या विद्यार्थ्यांकडून नियमित शुल्काच्या तिप्पट शुल्क आणि एनआरआय विद्यार्थ्यांकडून नियमित शुल्काच्या पाचपट शुल्क आकारण्याची मुभा संस्थांना असणार आहे. एनआरआय कोट्यातून प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना आयकर विभागाचे प्रमाणपत्र सादर करायचे आहे. तसेच पाल्य-पालक कायद्यानुसारच हे प्रवेश भरले जाणार आहेत.

## ITI प्रवेशासाठी २७ जूनपर्यंत मुदतवाढ मिळाली



**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत आयटीआय प्रवेशासाठी आता २६ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी २७ जूनपर्यंत संधी देण्यात आली आहे.**

आयटीआय प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने १५ मे २०२५ पासून राबवण्यात येत असून, प्रवेश अर्ज करणे, प्रवेश अर्ज निश्चित करणे आणि पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे ही सर्व प्रक्रिया उमेदवारांना २७ जूनपर्यंत करणे आवश्यक असणार आहे. प्राथमिक गुणवत्ता यादी ३० जूनला सकाळी ११ वाजता जाहीर करण्यात येणार आहे. अंतिम गुणवत्ता यादी ३ जुलै रोजी प्रकाशित केली जाणार आहे. पहिल्या प्रवेश फेरीसाठी संस्था आणि व्यवसायनिहाय निवड यादी संकेतस्थळावर ९ जुलैला प्रकाशित करण्यात येणार आहे. १० ते १५ जुलैदरम्यान विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावा लागणार आहे. त्यानंतर दुसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसाठी ६ जूनपासून चॅटबॉटचीही व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. चॅटबॉटद्वारे मदत करण्याबरोबरच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने प्रत्येक विभागात मदत संपर्क क्रमांक दिले आहेत.

### आयटीआयसाठी ७८,४०६ इतके प्रवेश निश्चित

राज्यात आयटीआयसाठी एकूण विद्यार्थी नोंदणी १ लाख ३९ हजार ३२ एवढी झाली आहे तर १ लाख २७ हजार ४५७ विद्यार्थ्यांनी पूर्ण अर्ज भरले आहेत. १ लाख २५ हजार ५ विद्यार्थ्यांनी शुल्क भरणा केला आहे, तर ७८ हजार ४०६ इतके प्रवेश निश्चित झाले आहेत. पर्यायी अर्ज भरलेले विद्यार्थी ६८ हजार ५८३ इतके आहेत, अशी माहिती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने दिली आहे.

## 'जवाहर नवोदय'च्या सहावीच्या जागांसाठी २९ जुलैपर्यंत करा अर्ज

**नवोदय विद्यालय समितीने (एनव्हीएस) जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीच्या जागांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७च्या जागांसाठी ही अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक मुलांचे पालक २९ जुलैपर्यंत प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. नवोदयच्या सहावीच्या जागांसाठी प्रवेश परीक्षेच्या आधारे प्रवेश देण्यात येत आहे.**

इच्छुक मुलांच्या पालकांना ऑनलाइन अर्ज cbseitms.rcil.gov.in या अधिकृत वेबसाइटवर करता येईल. शैक्षणिक सत्र २०२६- २७ मध्ये प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा दोन टप्प्यात घेतल्या जातील. प्रवेशासाठी परीक्षेचा पहिला टप्पा १३ डिसेंबर २०२५ रोजी प्रस्तावित आहे, तर परीक्षेचा दुसरा टप्पा ११ एप्रिल २०२६ रोजी घेण्यात येईल. जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीमध्ये प्रवेशासाठी वयोमर्यादा निश्चित केली आहे. ज्या अंतर्गत फक्त १० ते १२ वर्षे वयोगटातील मुलेच प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. वयोमर्यादा १ मे २०१४ ते ३१ जुलै २०१६ पर्यंत मोजली जाईल. म्हणजेच, मुलाचा जन्म त्या दरम्यान झाला असावा. जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीमध्ये प्रवेशासाठी इतर पात्रता निकषदेखील नमूद केलेले आहेत. महत्त्वाचे म्हणजे संबंधित विद्यार्थ्याने ज्या जिल्ह्यातील शाळेतून पाचवी उत्तीर्ण झाला असेल, त्याच जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीच्या वर्गात त्याला प्रवेशासाठी अर्ज करता येईल. अर्ज करण्यासाठी पासपोर्ट आकाराचा फोटो, मुलाची स्वाक्षरी, आधारकार्ड, निवास प्रमाणपत्र, इयत्ता पाचवीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

### जवाहर नवोदय शाळेत सहावीसाठी ८० जागा

प्रत्येक जवाहर नवोदय शाळेत सहावीसाठी ८० जागा आहेत. प्रवेशासाठीची परीक्षा १०० गुणांची आहे. २ तासांच्या वेळेच्या मर्यादेत असलेल्या या प्रवेश परीक्षेत अंकगणित, भाषा आणि मानसिक क्षमतेशी संबंधित प्रश्न विचारले जातात. चुकीच्या उत्तरांसाठी कोणतेही नकारात्मक गुण नाहीत. दिव्यांग मुलांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी अतिरिक्त ४० मिनिटे दिली जातात.



## NDA, NA साठी ऑनलाइन अर्ज भरणे सुरू, अंतिम तारिख १७ जून!

**केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससीने राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए )आणि नौदल अकादमी (एनए) परीक्षा (२) आणि संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (सीडीएस २) साठी अधिसूचना जाहीर केली आहे. या भरती परीक्षेसाठी पात्रता पूर्ण करणारे उमेदवार यूपीएससीच्या अधिकृत वेबसाइट upsc.gov.in ला ऑनलाइन पद्धतीने भेट देऊन अर्ज भरू शकतात. अर्ज करण्याची अंतिम तारीख १७जून २०२५ आहे.**

एनडीएसाठी अर्ज करणारा उमेदवार मान्यताप्राप्त बोर्ड, संस्थेतून बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. एनए/१०+२ उमेदवारासाठी भौतिकशास्त्र आणि गणित विषयांसह बारावी उत्तीर्ण किंवा त्यात शिक्षण घेत असावा. सीडीएस पदासाठी अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठ, संस्थेची अभियांत्रिकी पदवी असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी निर्धारित वयोमर्यादा देखील पूर्ण केलेली असावी. या भरतीमध्ये अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी प्रथम यूपीएससीच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन आवश्यक तपशील भरून एक वेळ नोंदणी (ओटीआर) करावी लागेल. त्यानंतर उमेदवार इतर तपशील, स्वाक्षरी, छायाचित्र इत्यादी अपलोड करून अर्ज प्रक्रिया पूर्ण करू शकतात. या भरतीमध्ये सहभागी होण्यासाठी सामान्य, ओबीसी आणि ईडब्ल्यूएस श्रेणीतील उमेदवारांना २०० रुपये भरावे लागतील. याशिवाय सर्व श्रेणीतील एससी, एसटी आणि महिला उमेदवार या भरतीत सामील होण्यासाठी मोफत अर्ज करू शकतात. अर्ज शुल्क ऑनलाइन भरता येते. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांना अधिकृत वेबसाइटला भेट देण्यासाठी सूचित केले आहे.

### आवश्यक कागदपत्रे

अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी आधीच सक्रिय ई-मेल आणि मोबाईल नंबर, फोटो, स्वाक्षरी, सर्व शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड इत्यादी सोबत ठेवावेत. अर्ज शुल्क जमा करण्यासाठी क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डचा वापर करता येणार आहे.



## MHT-CET निकाल १६ जूनला

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतलेल्या प्रवेश परीक्षांच्या सहा अभ्यासक्रमांच्या निकालाची संभाव्य तारीख जाहीर केली आहे. त्यानुसार ४ ते १७ जूनदरम्यान सहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात येणार आहेत. तब्बल पाच लाखांहून अधिक विद्यार्थी प्रतीक्षेत असलेल्या एमएचटी सीईटीचा पीसीबी आणि पीसीएम या दोन्ही गटांचा निकाल १६ जून रोजी जाहीर करण्यात येणार आहे.**

### निकालाच्या संभाव्य तारखा

- बी. डिझाईन सीईटी - ९ जून
- एमएचटी-सीईटी-१६ जून
- एलएलबी ३ वर्षे सीईटी- १७ जून

### एमएचटी सीईटीच्या दोन्ही गटांत ४० चुका

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) ९ एप्रिल ते ५ मे दरम्यान एमएचटी सीईटीची परीक्षा घेतली. २८ सत्रांमध्ये झालेल्या या परीक्षेमध्ये ४० प्रश्न चुकीचे असल्याचे आढळले आहेत. यामध्ये सर्वाधिक गणित विषयामध्ये २८ प्रश्न, भौतिकशास्त्रात सात, रसायनशास्त्रामध्ये चार आणि जीवशास्त्रमध्ये एक प्रश्न चुकीचा आहे. त्यामुळे ज्या सत्रामध्ये प्रश्न चुकीचे असल्याचे निदर्शनास आले आहे, त्या सत्रातील प्रत्येक विद्यार्थ्याला चुकीच्या एका प्रश्नासाठी एक गुण देण्यात येणार असल्याचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून जाहीर केले आहे.



## यूजीसी नेट सत्राची परीक्षा आता २५ ते २९ जूनदरम्यान होणार



**नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएने जून २०२५ च्या यूजीसी नेट सत्राच्या परीक्षेच्या तारखांमध्ये सुधारणा केली आहे. अधिसूचनेनुसार ही परीक्षा आता २५ ते २९ जूनदरम्यान घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. उमेदवारांना विषयवार वेळापत्रक https://ugcnet.nta.ac.in या अधिकृत पोर्टलवर पाहता येणार आहे.**

ही परीक्षा संगणक आधारित चाचणी (सीबीटी) पद्धतीने घेतली जाईल, ज्यामध्ये ८५ विषयांचा समावेश असणार आहे. एनटीए परीक्षेच्या तारखेच्या किमान १० दिवस आधी परीक्षा शहराची माहिती जाहीर करेल. या आगाऊ सूचनेमुळे उमेदवारांना त्यांच्या प्रवासाचे आणि अभ्यासाचे नियोजन करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे. यूजीसी नेट परीक्षेचे प्रवेशपत्रदेखील परीक्षेच्या अंदाजे १० दिवस आधी उपलब्ध करून दिले जाणार आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

### असे करा हॉलतिकीट डाउनलोड



उमेदवारांनी प्रथम एनटीएच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी. त्यानंतर यूजीसी नेट जून २०२५ प्रवेशपत्र डाउनलोड शीर्षकाची लिंक पहा. नंतर तुमचा अर्ज क्रमांक, जन्मतारीख आणि सुरक्षा पिन एंटर करा. क्रेडेन्शियल्स एंटर करा. प्रवेशपत्र डाउनलोड करा आणि प्रिंट करा. उमेदवारांना त्यांच्या प्रवेशपत्रावर छापलेली तारीख, शिफ्टची वेळ आणि ठिकाण यासह सर्व माहिती पुन्हा तपासण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## राष्ट्रीय शिक्षक प्रवेश परीक्षेससाठी अर्ज प्रक्रिया सुरू

राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएने राष्ट्रीय शिक्षक प्रवेश परीक्षेसाठी (एनटीईटी २०२५) अधिसूचना जाहीर करून अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. या परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांना एनटीएच्या अधिकृत वेबसाइट exams.nta.ac.in/ NTET ला भेट देऊन ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे. त्यासाठी २३ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. २४ जूनपर्यंत परीक्षा शुल्क जमा करण्याची संधी उमेदवारांना देण्यात आली आहे. भविष्यात अध्यापन क्षेत्रात करिअर करण्याचा विचार करणारे आणि आयुर्वेद, सिद्धा, युनानी, होमिओपॅथीमध्ये पदव्युत्तर पदवी (बी.यू.एम.एस, बी.एस.एम.एस, एम.डी) केलेले उमेदवार या परीक्षेत सहभागी होण्यास पात्र आहेत. राष्ट्रीय शिक्षक प्रवेश परीक्षा २०२५ ही राष्ट्रीय परीक्षा एजन्सी एनटीएद्वारे २७ जुलैला देशभरातील नियुक्त परीक्षा केंद्रांवर घेतली जाईल. परीक्षेदरम्यान उमेदवारांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी १२० मिनिटे दिले जातील.

## एकाच वेळी मिळवलेल्या दोन पदव्यांची वैधता कायम

**विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने एक महत्त्वाचा निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. अलीकडेच, आयोगाने जाहीर केलेल्या अधिसूचनेत असे म्हटले आहे की देशभरातील विद्यापीठांमधून विद्यार्थ्यांनी एकाच वेळी मिळवलेल्या दोन पदव्यांची वैधता कायम राहील.**



यूजीसीच्या या निर्णयामुळे एकाच वेळी दोन पदव्या घेतलेल्या लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल. यूजीसीने ३ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बैठकीत हा महत्त्वाचा बदल केला. हा बदल ५ जून रोजी अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आला. आता नवीन नियमांनुसार, जर एखाद्या विद्यार्थ्याने यूजीसीच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकाशनापूर्वी निश्चित केलेल्या मानकांचे पालन करून एकाच वेळी दोन शैक्षणिक अभ्यासक्रम केले असतील, तर ते वैध मानले जातील. हे अभ्यासक्रम यूजीसी, संबंधित विद्यापीठ किंवा त्याच्या कायद्याच्या पहिल्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी नियमांनुसार असणे आवश्यक आहे. जर ते व्यावसायिक अभ्यासक्रम असतील, तर त्यांना यूजीसीच्या दूरस्थ शिक्षण परिषद किंवा दूरस्थ शिक्षण ब्यूरोसारख्या संबंधित मान्यताप्राप्त संस्थेची मान्यता असली पाहिजे, असे देखील स्पष्ट केले आहे.

# नदीजोड प्रकल्पासह गावपातळीवरील जलसंधारणाच्या कामातून महाराष्ट्रातील पाणी प्रश्नावर यशस्वी मात करू –मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर**–महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठ्या धरणासमवेत नदीजोड प्रकल्प, जलसंधारण, जलपूनर्भरण, पाण्याचा पूनर्रवापर व इतर लहान मोठ्या प्रकल्पाची जोड देणे आवश्यक आहे. यादृष्टीने आपण पश्चिमी वाहिनीतील नद्यांचे समुद्रात वाहून जाणाऱ्या पाण्यापैकी ५४ टी.एम.सी. पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्याचा निश्चय केला आहे. याचबरोबर नळगंगा–वैनगंगा नदीजोड प्रकल्पाद्वारे विदर्भातील अर्वषणग्रस्त भागात पाणी आणत आहोत. तापी खोऱ्यातील जे पाणी गुजरात मार्गे समुद्रात वाहून जाते त्यातील ३५ टी.एम.सी. पाणी तापी खोऱ्यातच राहील, असे नियोजन केले आहे. या प्रकल्पातून भविष्यातील महाराष्ट्र हा दुष्काळाचा आव्हानावर यशस्वी मात करुन उभा राहिलेला महाराष्ट्र म्हणून ओळखला जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जनकल्याणकारी समिती नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वनामती सभागृह येथे तीन दिवसीय विदर्भ पाणी परिषदेच्या उद्घाटन समारंभात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी आमदार डॉ. परिणय फुके, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अतुल वैद्य, वनामतीच्या संचालक डॉ. वसुमना पंत, विदर्भ सिंचन विकास महामंडळाचे संचालक राजेश सोनटक्के, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे उपसंचालक डॉ. चंद्रकांत भोयर, राष्ट्रीय मृदा विज्ञान ब्युरो नागपूरचे संचालक डॉ. नितीन पाटील, प्र–कुलगुरू डॉ. सुभाष कोंडावार, कृषी सहसंचालक डॉ. उमेश घाटगे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे आदि मान्यवर उपस्थित होते.

विदर्भ आणि मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष हा अनेक वर्षांपासून राहिलेला आहे. पाणी नाही म्हणून सिंचन योजना नाही. सिंचना योजना नाही म्हणून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी नाही. यादुष्टचकरामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या म्हणजे विदर्भ असे चित्र तयार झाले होते. ते दूर करण्यासाठी आपण पाण्याचा नियोजनावर अधिक भर दिला. २०१४ मध्ये मी मुख्यमंत्री झाल्यावर बळीराजा योजना आणली. यात ९० योजना साकारल्या. जलयुक्त शिवार योजना राबवित जलसंवर्धन कार्यक्रमावर आपण भर दिला. शासनाच्या विविध योजना एकत्रित करीत जिल्हाधिकाऱ्यांना या योजनेचे प्रमुख केले. या योजनेच्या माध्यमातून राज्यात लोकसहभागातून व्यापक चळवळ निर्माण झाली. लोकांनी गावांगावांमधून सुमारे ७०० कोटी रुपये एवढा निधी जलसंधारणासाठी लोकसहभागातून उभा केला. या क्रांतीकारी निर्णयातून सुमारे २० हजार गावांमध्ये पाण्याचे चित्र बदलल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यात ज्या ठिकाणी पाणी नाही तेथील वेगळे प्रश्न आहेत. ज्याठिकाणी शाश्वत पाणी आहे त्याठिकाणी वेगळे प्रश्न तयार झाले आहे. पाण्याच्या मोकाट वापरामुळे सुपिक जमिनी या क्षारयुक्त झाल्याने शेतीसाठी कायमच्या अयोग्य होण्याच्या मार्गावर आहे. राज्यात तापी खोऱ्यामध्ये खारपानपट्ट्यातून वेगळे आव्हान आहे. यावर प्रभावी मात करण्यासाठी मोकाट पाण्याचा वापर बंद करुन ठिबक सिंचनसारखे उच्च कृषी तंत्रज्ञान वापरणे, मोकाट कॅनल ऐवजी पाईपलाईनने शेतात पाणी पोहोचविणे याशिवाय गत्यंतर नसल्याचे त्यांनी सांगितले.

तापी खोऱ्यातील पुनर्भरणासाठी आपण नुकताच मध्यप्रदेश समवेत करार केला. या प्रकल्पातून बुलढाणा, अकोला, वाशिम या भागातील जो खारपाण पट्टा आहे त्यावर आपल्याला मात करता येईल. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात शेतीला पाणी उपलब्ध होणार आहे. वैनगंगा– नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे ५०० किमीची नदीचे जाळे विदर्भात साकारणार आहे. अनेक वर्षापासून अपूर्ण असलेल्या गोसीखूर्द प्रकल्पाचे ९० टक्के काम आपण पूर्ण केले आहे. पाण्याची उपलब्धता यातून आपण करु शकलो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (पोखरा योजना) आपण विदर्भातील गावांमध्ये राबविण्याचा निर्णय घेतला आहे. जल साक्षरतेच्यादृष्टीने, लोकसहभागाला चालना देण्यासाठी, शेतकऱ्यांपर्यंत उच्चकृषी तंत्रज्ञान पोहचविण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण आहे. या योजनेतून मोठ्या प्रमाणात पाण्याचा जागर सुरु होईल. निसर्गाच्याकृपेने आपल्याला पाणी उपलब्ध होत असल्याने त्याचे मोल नाही. वातावरण बदलामुळे जलसंवर्धन, जलपुनर्भरण, पाण्याचा पुनर्वापर या त्रिसुत्रीच्या माध्यमातून आपल्याला जलसमस्येवर मात करता येईल. पाणी अमूल्य असल्याने त्याचा योग्य प्रमाणात वापर करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. औद्योगिकीकरणामुळे नद्यांचे होणारे प्रदूषण हे नागरीकरणामुळे होणाऱ्या प्रदूषणापेक्षा कमी आहे. नद्यांचे प्रदूषण जर थांबवायचे असेल तर प्रत्येक शहरामधून नद्यात जाणारे पाणी हे प्रक्रीया करुनच सोडले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# शालेय बस चालकांची दर आठवड्याला होणार मद्यपान चाचणी

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी राज्य शासनाचा निर्णय



**मुंबई** : विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शालेय बस चालकांची पार्श्वभूमी तपासणे, दर आठवड्याला त्यांची मद्यपान व औषध चाचणी करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. शालेय विभागाने जारी केलेले नवीन नियम राज्यातील सर्वच शाळांना लागू करण्यात आले आहेत.

शालेय शिक्षण विभागाने जारी केलेल्या निर्णयानुसार चालक, सफाई कामगार आणि महिला सेविकांची सकाळी व सायंकाळी अशी दोने वेळेस चाचणी होणे गरजेचे आहे. अनधिकृत व्यक्ती बसमध्ये प्रवेश करणार नाहीत. तसेच खासगी वाहनांमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी चालकाची ओळख व पार्श्वभूमी शाळेला कळवावी, अशी सूचनाही शासन निर्णयामध्ये करण्यात आल्या आहेत. तसेच, पालकांनी चालकांची वैयक्तिक माहिती स्वतःकडे ठेवावी, चालकांची पार्श्वभूमी, तसेच बेपर्वा ड्रायव्हिंग आणि भूतकाळातील अपघाताच्या घटनांचा समावेश असेल. विद्यार्थ्यांसाठी खासगी वाहतूक व्यवस्थेचा वापर करणाऱ्या पालकांनी शाळा व्यवस्थापनाला चालकाची पडताळणी आणि ओळख तपशिलांची माहिती देणे आवश्यक आहे. बसमध्ये जीपीएस आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, दर सहा महिन्यांनी बसची तांत्रिक तपासणी करून आरटीओकडून प्रमाणपत्र घेणे, अशा विविध उपाययोजनांची अमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शाळांनी शौचालये, परिसर आणि इतर संवेदनशील ठिकाणी देखरेख ठेवावी.

शासन निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित झाल्याचे स्कूलबस ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष अनिल गर्ग यांनी सांगितले. मुख्याध्यापकांची जबाबदारी निश्चित झाली असून विद्यार्थ्यांच्या वाहतुकीच्या वेळी सुरक्षेची पूर्ण जबाबदारी त्यांच्यावर असेल, असेही ते म्हणाले.

# महिला सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका मोलाची –मुख्यमंत्री फडणवीस



**नागपूर**–महिला सक्षमीकरणात शिक्षण हा अत्यंत मोलाचा घटक असून यासाठी मुलींना प्रोत्साहित करणाऱ्या अनेक योजना राज्य शासनातर्फे राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आरबीएलच्या उम्मीद उपक्रमाअंतर्गत गरजू विद्यार्थिनींना सायकल व शालेय साहित्याचे वितरण हा उपक्रम प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. आरबीएल बँकेतर्फे उम्मीद या समाजसेवी (सीएसआर) उपक्रमाअंतर्गत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विद्यार्थिनींना सायकल व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच धन्वंतरी आरोग्य शिबिराचे उदघाटनही यावेळी करण्यात आले.

आमदार संदीप जोशी, प्रवीण दटके, आरबीएलचे कोषाध्यक्ष अशोक चांडक व संचालक मंडळाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मनीष नगर परिसरात आयोजित कार्यक्रमात आज उपस्थितांच्या हस्ते १०० सायकलींचे वाटप करण्यात आले. मुख्यमंत्री म्हणाले, मुलींच्या शिक्षणातीतील एक मोठा अडथळा म्हणजे त्यासाठी करावा लागणारा लांब पल्ल्याचा प्रवास हा आहे. आरबीएलतर्फे वितरीत करण्यात येणाऱ्या सायकलींमुळे विद्यार्थिनींना शाळेत जाणे सुलभ होण्यासह उपस्थितीत सातत्य राखण्यासाठी मदत होत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी याची अधिक मदत होत आहे.

समाजातील गरजू व वंचित विद्यार्थिनींच्या शैक्षणिक समस्यांची जाणीव ठेवून आरबीएल आपली सामाजिक जबाबदारी पार पाडत आहे. हे अत्यंत स्तुत्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, आरबीएलतर्फे दरवर्षी विविध उपक्रम राबविण्यात येतात. धन्वंतरी आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून डोळे तपासणी, चष्मे वाटप तसेच इतर तपासण्या निःशुल्क करण्यात येत आहेत. मुलींचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी याचा निश्चितच उपयोग होईल.

नुकतेच गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील कवंडे या गावी विद्यार्थिनींना सायकलवाटप करण्यात आले. त्यावेळी विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरील आनंद बघून समाधान लाभल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

## टोल मागितला म्हणून कर्मचाऱ्याला ट्रकखालीच चिरडले

**चंद्रपूर:** महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथील विसापूर टोल पोस्टवर एक धक्कादायक घटना समोर आली आहे. टोल कर्मचाऱ्याने टाटा एस कारच्या चालकाकडून टोल मागितला असता, तो टाळण्यासाठी चालकाने टोल कर्मचाऱ्याच्या अंगारून गाडी न्हेली, क्रूरतेचा कळस म्हणजे इथेच तो थांबला नाही तर, त्याने काही मीटर टोल कर्मचाऱ्याला फरफटत देखील न्हेले. ज्यामध्ये कर्मचारी गंभीर जखमी झाला आहे. सदर वाहन चालक बेपत्ता जरी असला तरी, ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, रात्री १ वाजताच्या सुमारास बल्लारशाहहून चंद्रपूरकडे येणाऱ्या एका टाटा एस कारने टोल टाळण्यासाठी लाईन ओलांडली. यादरम्यान, एका टोल कर्मचाऱ्याने चालकाला गाडी थांबवण्यास सांगितले तेव्हा त्याने गाडी थांबवली नाही आणि कर्मचाऱ्याला चिरडून गाडी भरधाव पुढे न्हेली. ज्यामध्ये टोल कर्मचारी गंभीर जखमी झाला. शहरातील एका खाजगी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

# शिष्यवृत्तीच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक महाविद्यालयात 'नोडल अधिकारी' म्हणून प्राध्यापकांकडे जबाबदारी

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे निर्देश

**मुंबई**– राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्काची परतफेड, निर्वाह भत्ता यांसारख्या योजना प्रभावीपणे पोहोचण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात नोडल अधिकारी म्हणून प्राध्यापकांकडे जबाबदारी दिली जावी, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणी संदर्भात राज्यातील सर्व शासकीय विद्यापीठांच्या कुलगुरुंसोबत मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात झालेल्या बैठकीत मंत्री श्री. पाटील बोलत होते. या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, सुकानु समितीचे प्रमुख डॉ. नितीन करमळकर, तसेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रविंद्र कुलकर्णी आणि राज्यातील सर्व प्रमुख शासकीय विद्यापीठांचे कुलगुरु उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, मुलींचे शैक्षणिक शुल्क शासन भरत असून विद्यार्थ्यांच्यासाठी देखील विविध योजना आहेत. त्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे यासाठी नोडल अधिकारी म्हणून प्राध्यापकांनी काम करावे. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय अस्मितेचे शिक्षण देण्यासाठी एनसीसीचा सहभाग वाढवावा. विद्यापीठ परीक्षा निकाल ३० दिवसांच्या आत जाहीर होण्याची व्यवस्था करण्यात यावी असेही त्यांनी सांगितले.

मंत्री पाटील म्हणाले, आंत्रप्रिनरशीप अंतर्भूत पदवी/ पदविका कार्यक्रम (pprenticeship Embedded Degree/ Diploma Programme-EDP) अंतर्गत विद्यापीठांनी संबंधित क्षेत्रातील उद्योग व कंपन्यांसोबत भागीदारीत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करावेत.यामुळे बी.ए., बी.कॉम., बी.एससी. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण व करिअर संधी उपलब्ध होतील. नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठे महाराष्ट्रात प्रवेश करण्याच्या तयारीत आहेत. त्यांच्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी राज्यातील विद्यापीठांनी दर्जा वाढवण्याची तयारी ठेवावी. प्राध्यापकांच्या व्यक्त मध्ये भरण्यासाठी विद्यापीठांना परवानगी दिली आहे.सेवेचा अधिकार कायदा (RTS) अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी आवश्यक २० सेवा १५ जुलै २०२५ पर्यंत सुरु कराव्यात. या अंमलबजावणीसाठी विविध विभागांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील काल मर्यादेत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांनी दिल्या.

या बैठकीत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. धोरणात्मक निर्णयांसह विद्यापीठांनी शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने राबवण्यावर भर देण्यात येईल असे यावेळी सांगण्यात आले.

# प्रत्येक व्यक्तीला निरोगी आयुष्य जगण्यासाठी अन्न सुरक्षा: कृतीत विज्ञान या संकल्पनेला पुढे नेण्याची गरज : अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

**मुंबई**–प्रत्येक व्यक्तीला निरोगी आयुष्य जगण्यासाठी चांगल्या आहाराची आवश्यकता असते.सुरक्षित अन्न व औषध प्रत्येक व्यक्तीला मिळावे यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने अन्न सुरक्षाः कृतीत विज्ञान या संकल्पनेला पुढे नेण्याची गरज आहे.विभागात १९४ अन्न सुरक्षा अधिका–यांची पदभरती झाल्याने या विभागातील कामकाज अधिक गतीने होईल असे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले.

'जागतिक अन्न सुरक्षा दिन–२०२५' या निमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटर येथे अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विशेष राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मंत्री श्री. झिरवाळ बोलत होते. यावेळी राज्यमंत्री योगेश कदम, आमदार कालिदास कोळंबकर, सचिव धीरज कुमार, अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त राजेश नार्वेकर, आहारतज्ज्ञ जगन्नाथ दीक्षित,पाककृती तज्ज्ञ विष्णू मनोहर उपस्थित होते.

मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले की,जागतिक आरोग्य संघटनेने अन्न सुरक्षाः कृतीत विज्ञान या संकल्पनेवर आधारित जागतिक अन्न सुरक्षा दिन – २०२५ ची संकल्पना घेतली आहे.या संकल्पनेचे महत्व असे आहे की शेतापासून ते थेट आपल्या जेवणाच्या ताटापर्यंत अन्न सुरक्षित ठेवण्यामध्ये विज्ञानाचा आधार घेवून हे काम अधिक गतीमान करता येईल.एखादी व्यक्ती आजारी पडली की औषध वेळेवर खाते मात्र आजारीच पडू नये म्हणून योग्य आणि संतुलित आहार घेणे गरजेचे आहे. योग्य अन्न खाणे खूप महत्वाचे आहे.त्यामुळे अन्न सुरक्षितता जनजागृती खूप महत्वाची आहे. आपण खाल्लेल्या अन्नाबद्दल अधिक जागरूक राहणे गरजेचे आहे असेही ते म्हणाले.

मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले की,ज्या अधिका–यांचा उत्कृष्ठ कामासाठी सत्कार करण्यात आला त्यांनी देखील आपल्या सहका–यांना मार्गदर्शन करावे.तसेच विभागाचे धोरण ठरविण्यासाठी सर्वांनी आपली मते विभागाला कळवावीत.अन्न व औषध प्रशासन विभागाने निकृष्ट दर्जाच्या,बनावट,भेसळयुक्त किंवा प्रतिबंधित केलेल्या अन्न पदार्थ आणि औषध उत्पादनांची विक्री रोखण्याचे काम करावे असेही ते म्हणाले.

राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, अन्न व औषध प्रशासन विभागाने आपली कार्यपद्धती अधिक पारदर्शक, प्रभावी आणि विश्वासार्ह करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे.अन्न व औषध विभागामार्फत जे इन्स्पेक्शन करणार आहोत, त्याचे संकलन आणि विश्लेषण कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) च्या साहाय्याने व्हायला हवे. त्यामुळे कार्यपद्धती जलद, अचूक आणि डेटा आधारित होईल, असे मंत्री श्री. कदम यांनी सांगितले. अन्न संरक्षण अधिकारी प्रमाणेच ड्रग इन्स्पेक्टर पदासाठी भरती लवकरच करण्यात येणार असल्याचेही राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले.

या कार्यक्रमात ऋेत्र डरषशीं: डलळशपलश ळप लींळेप या संकल्पनेवर आधारित विविध सत्रे, माध्यमांद्वारे जनजागृती, तज्ज्ञांचे विचार, आणि राज्यातील अन्न सुरक्षा संबंधित उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. तसेच यावेळी उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचारी व संस्थांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात अन्न व्यवसायिक प्रतिनिधी डॉ. प्रबोध हळदे, बीजे मेडीकल कॉलेजचे विभागप्रमुख तथा आहारतज्ज्ञ जगन्नाथ दिक्षीत,प्रख्यात पाककृती तज्ज्ञ विष्णु मनोहर यांनी मार्गदर्शन केले.

तसेच अन्न व्यावसायिकांना, अन्न अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्र वाटप करण्यात आले. नव्याने नियुक्त झालेल्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना मंत्री श्री. झिरवाळ व राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते नियुक्तपत्र प्रदान करण्यात आले.

# लोणावळ्याच्या भुशी डॅमजळ दोघेजण बुडाले

**पुणे** : भुशी डॅम हे लोणावळ्यातील सर्वात लोकप्रिय ठिकाण आहे. पावसाळा सुरु झाला ही हजारो पर्यटक भुशी डॅमवर वर्षा सहलीची आनंद लुटायले येतात. मात्र, हेच ठिकाण पर्यटकांच्या जीवावर बेतत आहे. लोणावळ्याच्या भुशी धरणाच्या बॅक वॉटरमध्ये बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे. ११ महिन्यांपूर्वीच लोणावळ्याच्या भुशी धरणाच्या बॅक वॉटरजवळच एक भयानक घटना घडली होती. एकाच कुटुंबातील १० जण येथे अडकले होते. ५ जण पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेले.

लोणावळ्याच्या भुशी धरणाच्या बॅक वॉटर परिसरात धरणाच्या पाण्यात बुडून दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. साहिल शेख आणि मोहम्मद जमाल अशी बुडालेल्या तरुणांची नावे आहेत.

# वाल्मिक कराडच्या दोषमुक्तीच्या अर्जाला विरोध

**बीड**–संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडच्या दोषमुक्ती अर्जाला विरोध करण्यात आला आहे. आवादा पवनचक्की प्रकल्पाच्या शिवाजी थोपटे आणि सुनील शिंदे यांनी विरोध केला आहे. बीडच्या विशेष न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आलं आहे. वाल्मिक कराडकडून न्यायालयात वकिलाच्या मार्फत दोषमुक्तीचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याने बीड न्यायालयात दोषमुक्ततेचा अर्ज दाखल केला आहे. मात्र या अर्जाला आवादा पवनचक्की प्रकल्पातील अधिकाऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे. कंपनीच्या शिवाजी थोपटेकडे २ कोटींची मागणी केली होती. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी आरोपी सुदर्शन घुले याने शिवाजी थोपटे आणि सुनील शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर कराडच्या सहकाऱ्यानी ६ डिसेंबर रोजी पवनचक्की कंपनीच्या वॉचमनला मारहाण केली. या प्रकरणात वाल्मिक कराडने वकिलामार्फत न्यायालयात आपल्यावरील आरोप फेटाळत मी निर्दोष आहे, असा दावा केला होता. परंतु न्यायालयाने सरकारी वकील, तपासी अधिकारी तसेच आवादा प्रकल्प व्यवस्थापकांचे म्हणणे मागवले आहे.


## ड्रायव्हर पाहिजे

अनुभव असलेला प्रामाणिक आणि वेळेचे भान असणारा व्यक्ती ड्रायव्हर म्हणून हवा आहे. लायसन्स असणे आवश्यक. पगार रुपये १५००० ते २०,००० रुपये (अनुभवावर आधारित)

**स्थळ – किनवट**

**संपर्कासाठी मोबाईल नंबर**

**७६२०८५४९७०**

## पाहिजेत

**महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था मुंबई व धन्वंतरी सेवाभावी संस्था नांदेड संचलित CCTI PROJECT नांदेडसाठी जून २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीसाठी खालील पदे भरणे आहेत.**

| अ. क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | अकाउटंट कम डाटा एंट्री ऑपरेटर | ०१ | B.com,M.Com,M.B.A. व संगणकाचे संपूर्ण ज्ञान असावे व २/३ वर्षाचा अनुभव आवश्यक | १६००० पगार+ ६०० रुपये प्रवास भत्ता |
| २ | आऊट रिच वर्कर्स | ०२ | B.A.,B.com. कोणताही पदवीधर | १०५०० पगार+ १५०० प्रवास भत्ता |

**मुलाखतीचे ठिकाण– ऊमा बिल्डिंग पहिला मजला**

**बि.के. इन्टरप्राइजेस जवळ लक्झरी स्टन्ड जवळ बाफना रोड नांदेड –४३१६०१**

**मुलाखत दिवस – दिनांक १० /०६/२०२५**

**वार मंगळवार वेळ – ठिक –सकाळी ११ वाजता**

**संपर्क –सुमीत सुर्यवंशी (प्रकल्प व्यवस्थापक)**

**धन्वंतरी सेवाभावी संस्था नांदेड**

**मोबाईल नंबर –७०२८२०८६८०**

## Change In Name

My Old Name is - ABDUL SALAM ABDUL SATTAR which now I am changing as New Name - ABDUL SALAM. Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address: D/O Abdul salam, 9-7-45 Hyder bagh No.1, Degloor naka, Itwara Nanded, Dist. Nanded, Maharashtra - 431604

## Change In Date of birth

My Old date of birth: 26/03/2000 now I am changing as New date of birth: 06/03/2000

Address: D/O Abdul salam, 9-7-45 Hyder bagh No.1, Degloor naka, Itwara Nanded, Dist. Nanded, Maharashtra - 431604

## Change In Name

My Old Name is - ASFIYA FATEMA ABDUL SALAM which now I am changing as New Name - ASFIYA FATEMA Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address: D/O Abdul salam, 9-7-45 Hyder bagh No.1, Degloor naka, Itwara Nanded, Dist. Nanded, Maharashtra - 431604

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८



स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला,
शिवाजी नगर, नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायांवर पोलिसांचे धाडसत्र




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रात हातभट्टीची दारू व रसायनाचा नाश, त्याचप्रमाणे अवैध दारूची वाहतूक व विक्री रोखण्यासाठी रविवारी (दि.८ जून) रोजी परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत एकाच वेळी धाडसत्र करण्यात आले. या धाडसत्रामध्ये १६१ अधिकारी, ६९९ अमलदारांनी २५५ केसेस करून तब्बल सात लाख ७५ हजार ७७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत, नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, परभणीचे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, हिंगोलीचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे मार्गदर्शनाखाली, संबंधित जिल्ह्यातील अपर पोलीस अधीक्षक, सर्व पोलीस उप अधीक्षक, संबंधित पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, अंमलदार यांचे सह स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांचा समावेश होता.

दरम्यान, आपापल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती नागरिकांनी, संबंधित पोलिसांना देऊन, पोलिसांच्या सदर मोहिमेस हातभार लावावा, असे आवाहन पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी चारही जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

| अ.क्र. | जिल्हा | एकुण दारुबंदी केसेस | सहभागी आरोपींची संख्या | जप्त मुद्देमालाचे वर्णन | | जप्त मुद्देमालाची किंमत | सहभागी अधिकारी व अंमलदारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड | 115 | 115 | 1.हातभटटी दारु | 2170 लिटर | 4,26,375/- | अधिकारी : 70 अंमलदार : 280 |
| | | | | 2. दारुचे रसायन | 1067 लिटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 1516 बॉटल | | |
| | | | | 4.विदेशी दारु | 119 बॉटल | | |
| | | | | 5.सिंदी | 535 लिटर | | |
| 2 | परभणी | 46 | 46 | 1.हातभटटी दारु | 286 लिटर | 1,72,755/- | अधिकारी : 23 अंमलदार : 168 |
| | | | | 2.दारुचे रसायन | 12078 लिटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 411 बॉटल | | |
| 3 | हिंगोली | 27 | 27 | 1.हातभटटी दारु | 42 लिटर | 37,970/- | अधिकारी :40 अंमलदार :122 |
| | | | | 2.दारुचे रसायन | 35 लिटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 336 बॉटल | | |
| 4 | लातूर | 67 | 67 | 1.हातभटटी दारु | 462 लिटर | 1,38,675/- | अधिकारी : 28 अंमलदार :129 |
| | | | | 2. दारुचे रसायन | 577 लिटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 688 बॉटल | | |
| एकुण | | 255 | 255 | 1.हातभटटी दारु | 2960 लिटर | 7,75,775/- | अधिकारी : 161 अंमलदार : 699 |
| | | | | 2. दारुचे रसायन | 13757 लिटर | | |
| | | | | 3.देशी दारु | 2951 बॉटल | | |
| | | | | 4.विदेशी दारु | 119 बॉटल | | |
| | | | | 5.सिंदी | 535 लिटर | | |

## तरोड्यात धाडसी घरफोडी तर बसस्थानक परिसरातून महिलेची पर्स लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील तरोडा बुद्रुकमध्ये घरफोडी करून चोरट्याने साडेचार लाख रुपयांचा ऐवज लंपास केला, तर बसस्थानक परिसरातून दीड लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असलेली पर्स दुचाकीस्वार चोरट्यांनी लंपास केली. याप्रकरणी भाग्यनगर आणि वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील तरोडा (बु.) मध्ये एक घरफोडून चोरट्यांनी ४ लाख ६७ हजारांचा ऐवज चोरून नेला. रेल्वे स्थानक ते बसस्थानक या रस्त्यावर सासू आणि सून जात असतांना दोन चोरट्यांनी त्यांच्या पर्समधील सोन्या-चांदीचे दागिने आणि दोन मोबाईल असा १ लाख ४० हजारांचा ऐवज बळजबरीने हिसकावला आहे.

तरोडा (बु) मधील बर्डे हॉस्पीटलच्या शेजारी असलेले बालाजी विश्वनाथ शिंदे यांचे घर ५ जूनच्या रात्री त्यांचे बंद फोडून चोरट्यांनी ४ लाख ६७ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिणे चोरून नेले. भाग्यनगर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरिक्षक वाडेवाले अधिक तपास करीत आहेत.

शनिवारी सायंकाळी ५.१५ ते ५.३० वाजेदरम्यान रेल्वे स्थानक ते बसस्थानक रस्त्यावरून चालत बसस्थानकाकडे जात असतांना हिंगोली येथील सुर्यश्री विशाल काटमवार या महिलेची पर्स हिस्कावून नेली. या पर्समध्ये सोन्या-चांदीचे दागिणे होते. वजिराबाद पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरिक्षक लोंढे अधिक तपास करीत आहेत.

## जयवंत कोंडविलकर यांचे व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्रामध्ये मंगळवारी (दि. १०) सायंकाळी ६-३० वाजता मुंबई येथील पूर्व सीमा विकास प्रतिष्ठानचे कार्यवाह जयवंत कोंडविलकर यांचे 'धुमसता ईशान्य भारत' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.



कोंडविलकर हे रत्नागिरी राजापूर तालुक्यातील जुवाठी हे यांचे मूळ गाव असून जवळ असलेल्या कोंडये त्यांचे शालेय शिक्षण झाले. मुख्याध्यापक भय्याजी काणे समर्पित व्यक्तिमत्व होते. ७० च्या दशकात राष्ट्रप्रेमाने झपाटलेल्या भैय्याजींनी मणिपूर हे आपले कार्यक्षेत्र म्हणून निवडले व तिथे अवघ्या १२ वर्षीय जयवंत कोंडविलकर यांना सोबत नेले. तेव्हापासून ते मणिपुरी समाजजीवनात मिसळून गेले. तिथे शिक्षक म्हणून कार्य करताना नागा/कुकी जमातींच्या मुलांचे जीवन सक्षम करण्यासाठी त्यांनी जिवापाड प्रयत्न केले. हे त्यांचे कार्य समजून घेणे व त्यांच्याकडून ईशान्य भारतातील समाजस्थिती लक्षात घेणे खूप उद्बोधक ठरणार आहे. सायन्स कॉलेज जवळच्या नरहर या व्याख्यानाचा जरूर लाभ घ्यावा असे आवाहन केन्द्राचे संचालक डॉ.यशवंत जोशी यांनी केले आहे.

## लोह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणार –आ. चिखलीकर



**लोहा (प्रतिनिधी)–** शहरात अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याची अनेक वर्षांची मागणी आहे. ही मागणी लक्षात घेता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे लोहा शहरात स्मारक उभारण्यात येईल, अशी ग्वाही आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.

लोहा शहरात रविवार (दि. ८) अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी करण्यात आली. बैल बाजार मैदानात बिरोबा मंदिरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मिरवणुका आरंभ झाला. तत्पूर्वी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, राम सूर्यवंशी, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव हाके, हळदवचे सरपंच प्रल्हाद वडजे, हरिभाऊ चव्हाण, मंगेश क्षीरसागर, जयंती मंडळाचे अध्यक्ष पिराजी धुळगंडे, उपाध्यक्ष गजानन गुंठे, माळेगाव सरपंच हणमंत धुळगंडे, गिराज सुरनर, शंकर गुंठे, दशरथ गुंठे, व्यंकट जंगले, मारोती जंगले, माधव डोईफोडे, किरण डोईफोडे, केशव खांडेकर यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आज ४ थ्या राज्यस्तरीय डान्स स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील श्रीकृष्ण मंगल कार्यालय तरोडा बुद्रुक येथे सोमवार दि. ९ जून रोजी ४ थ्या राज्यस्तरीय डान्स स्पर्धा २०२५ ही होणार आहे. नांदेड जिल्हा फ्लाईंग डान्स असोसिएशनने या स्पर्धे चे आयोजन केले आहे. सदरील डान्स स्पर्धा सर्वांसाठी खुली असल्यामुळे अनेक राज्यांमधून खेळाडू येणार आहेत. सोमवारी दुपारी ४ वाजल्यापासून ते रात्री १० वाजेपर्यंत ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी शहरातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा फ्लाईंग डान्स असोसिएशनचे अध्यक्ष पूजा लक्ष्मण फुलारी व सचिव सागर दास यांनी केले आहे.

## संगम अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीची निवडणूक जाहीर

### जिल्हाधिकारी राहुल कर्डिले निवडणूक निर्णय अधिकारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली संगम अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीची निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने ही माहिती दिली आहे.

दिल्ली येथील सहकारी निवडणूक प्राधिकाकरणाचे सहायक निबंधक यांच्या पत्रानुसार सदर संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक घेण्यासाठी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची नियुक्ती केली आहे.

संस्थेसाठी ९ ९ संचालक निवडून द्यावयाचे आहेत. त्यामध्ये सर्वसाधारण मतदार संघातून ६, अनुसूचीत जाती/जमाती मतदार संघातून १ आणि महिला राखीव मतदारसंघातून २ संचालकाची निवड करावयाची आहे.

९ जून रोजी संस्थेच्या पात्र मतदारांची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. १० ते १५ जून दरम्यान प्रारुप मतदार यादीवर आक्षेप नोंदविणे, १६ ते १९ जून दरम्यान छाननी, १९ जून रोजी दुपारी ३ वा. अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

२० ते २४ जून या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ यावेळेत नामनिर्देशनपत्र दाखल करता येईल. प्राप्त नामनिर्देशन पत्राची प्रसिध्दी २४ जून रोजी दुपारी ५ वा. करण्यात येणार आहे. नामनिर्देशन पत्राची छाननी १ जुलै रोजी करुन वैध नामनिर्देशन पत्राची प्रसिद्धी १ जुलै रोजी दुपारी ५ वा. करण्यात येणार आहे. ७ जुलै रोजी दु. ३ वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्र परत घेता येतील. त्यानंतर निवडुन द्यावयाच्या उमेदवारांची यादी ७ जुलै रोजी दु. ५ वा. प्रसिद्ध करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास १३ जुलै रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ या कालावधीत मतदान घेण्यात येणार आहे. १३ जुलै रोजी मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे.

संगम अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि., देशमुख, कॉम्पलेक्स् नविन मोंढा नांदेडच्या सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन संगम अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि., देशमुख कॉम्पलेक्स् नविन मोंढा नांदेडचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

संस्थेच्या संचालक मंडळ निवडणुकीचा कार्यक्रम संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. अधिक माहिती संस्थेचे देशमुख, कॉम्पलेक्स, नविन मोंढा, नांदेड येथील मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील, असे प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट केले आहे.




**नांदेड** : शिवसेना नेते तथा राज्याचे मृंद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या राजगड जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करतांना आमदार बोंढारकर. या प्रसंगी जिल्हाप्रमुख विनय गिरडे आदी शिवसैनिक दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

## चंद्रशेखर दहीवले यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'आयबी'चे माजी वरिष्ठ अधिकारी तथा धम्म निरंजन केंद्राचे प्रमुख चंद्रशेखर दहीवले (वय ८०) यांचे रविवारी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले.



वरिष्ठ पोलिस अधिकारी पदावरून स्वेच्छा निवृत्ती घेतल्यापासून विपश्यनेसाठी जीवन समर्पित केले होते. सत्यनारायण गोयंका यांनी भारतासह जगभर चालविलेल्या विपश्यना साधना प्रचार व प्रसारासाठी स्वतः ला वाहून घेतले होते. त्यांच्या पश्चात मुलं श्रीकांत, प्रशांत व पत्नी मंगला दहिवले असा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल मराठा सेवा संघाचे अध्यक्ष कामाजी पवार व इतर मान्यवरांनी दुःख व्यक्त केले.

## संध्या-छाया वृद्धाश्रमातर्फे खुली निबंध स्पर्धेचे

**नांदेड (प्रतिनिधी)–** जनजागृती व्हावी यासाठी संध्या छाया वृद्धाश्रमाच्या वतीने खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'वृद्धांची अवहेलना' हा निबंधाचा विषय आहे, अशी माहिती संयोजिका सुरेखा पाटणी, डॉ. अंजली चौधरी आणि डॉ. पी. डी. जोशी पाटोदेकर यांनी दिली आहे.

वृद्धांना कायदेविषयक तरतुदी संबंधी माहिती देण्याकरिता वृद्धांमध्ये आणि समाजामध्ये वृद्धांची अवहेलना या विषयावर ५०० शब्दांमध्ये हस्तलिखित सुवाच्य अक्षरात निबंध असावा. निबंध दि. १२ जून संध्याकाळ पाचवाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. स्पर्धकांनी स्वतःचे संपूर्ण नाव पत्ता मोबाईल नंबर देणे अनिवार्य आहे. परीक्षकांचा निर्णय अंतिम असणार आहे. यशश्री नागरी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड जिल्हा नांदेड तेजस संकुल डॉक्टर पी. डी. जोशी पाटोदेकर हॉस्पिटल महावीर चौकाजवळ नांदेड मोबाईल नंबर ९९७५२५४२२१ या पत्त्यावर निबंध पाठवायचे आहेत. विजेत्यांना प्रथम क्रमांक ५०१ रुपये, द्वितीय क्रमांक ३०२ रुपये तृतीय क्रमांक २०१ रुपये असे बक्षीस देण्यात येणार आहेत. असा आहे, अशी माहिती कार्यक्रमाच्या संयोजिका सुरेखा पाटणी, डॉ. अंजली चौधरी आणि डॉ. पी. डी. जोशी पाटोदेकर (अध्यक्ष) संध्या छाया वृद्धाश्रम नांदेड यांच्यावतीने देण्यात आली आहे.

## हौशी फोटोग्राफर्ससाठी कॉफी टेबल बुक-नांदेड छायाचित्र स्पर्धा

**नांदेड (प्रतिनिधी)–** हौशी फोटोग्राफर्ससाठी कॉफी टेबल बुक-नांदेड छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विविध जैवविविधता, पर्यटनस्थळ, पशु-पक्षी, वनसंपदा, धबधबे, नदी, शिल्प, ऐतिहासिक स्थळे आदी विषयांना प्रतिबिंबीत करणारे, नव्याने तयार झालेली पर्यटनस्थळ, नव्या तंत्राव्दारे काढलेली छायाचित्रे १५ जुलै २०२५ पर्यंत चित्र पाठवण्याची मुदत आहे. जिल्ह्यातील हौशी छायाचित्रकारांनी या स्पर्धेत मोठ्या प्रमाणात हौशी छायाचित्रकारांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी केले आहे.

छायाचित्र स्पर्धेसाठी विषय : निसर्ग, पशु-पक्षी, शिक्षण, कला, जुनी नवी स्थापत्य, जीवनशैली, खेळ, पर्यटन, खाद्य संस्कृती, जैवविविधता, परंपरा, संस्कृती, नांदेड जिल्ह्यातील नवीन पर्यटनस्थळे, माहिती नसलेली स्थळे हे विषय छायाचित्र स्पर्धेत समाविष्ट होणाऱ्या छायाचित्रांकरिता देण्यात आली आहेत.

या विषयात १ जानेवारी २०२५ ते फोटोस्पर्धा सामिल होण्याच्या १५ जुलै २०२५ रोजी मध्यरात्री पर्यंत काढलेली छायाचित्र नमुद अटी शर्तीत बसणारीच ग्राह्य धरल्या जातील. फोटोस्पर्धेत निकाल अंतीम करण्याचे, नाकारण्याचे सर्व हक्क आयोजन समितीचे राहतील.

परिक्षेच्या निकालाबाबत सर्व अधिकार निवड समिति व जिल्हा प्रशासनाकडे राखीव राहतील. सर्व सहभागी छायाचित्र स्पर्धकांना सहभागाचे ई-प्रमाणपत्र प्राप्त होईल. छायाचित्रे पाठविण्यासाठी ईमेल आयडी - clicknandedgmail. com संपर्कासाठी भ्रमणध्वणी क्रमांक ७९७२३७०४३९ (सोपान गुंडाळे, सहा. मह. अधि., जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड) हा आहे.

**नियम अटी व शर्ती** : नांदेड जिल्ह्यात भौगोलीक क्षेत्र मर्यादापुरती छायाचित्र स्पर्धेसाठी छायाचित्र ईमेल आयडीवर पाठविण्यात यावीत. प्रत्येक छायाचित्रासोबत, दोन ते तीन वाक्यात माहिती मराठी भाषेत, युनिकोड फॉन्टवर किंवा हस्तलिखित करुन त्याचा स्पष्ट फोटो स्वरूपात करुन पाठवावी. एका छायाचित्रकाराला स्पर्धेत घोषीत विषयासाठी एकुण दहा छायाचित्र सहभागी करता येतील. स्पर्धेत आयोजकांमार्फत मुळ थीमशी जुळणारी त्यांची मूळ डिजिटल छायाचित्रे मागणी केली गेल्यास स्पर्धकास ती सादर करावी लागतील.

स्पर्धेत जानेवारी २०२५ ते फोटो स्पर्धा सामिल होण्याच्या अंतिम तारखेपर्यंत काढलेली छायाचित्रच ग्राह्य धरल्या जातील. फोटो/छायाचित्रे उक्त अर्जासह (अर्ज पीडीएफ स्वरुपता २ एमबी मर्यादीत) ईमेल आयडीवरच सादर केलेली ग्राह्य धरली जातील. ब्लर झालेली छायाचित्रे ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

डीएसएलआर ऊडङठ आणि मोबाईल फोटोग्राफी या दोन्ही फॉर्ममध्ये स्पर्धक भाग घेऊ शकतात. मान्यताप्राप्त ठिकाणाची व नोंदणीकृत ड्रोन प्रणालीद्वारे काढलेली छायाचित्रेच स्पर्धेसाठी स्विकारली जातील याची सहभागी हौशी, प्रोफेशनल फोटो ग्राफर्सने नोंद घ्यावी. फोटो उच्च-रिझोल्यूशन जेपीईजी गझएॠ किंवा पीएनजी झछॠ फाइल्स असणे आवश्यक आहे. फोटोवर कोणत्या प्रकारचा लोगो, वॉटर मार्क, कॉपीराईट मार्क, ओळखीचे चिन्ह, अथवा कोणतीही अन्य दृष्य स्वरुपाची बाब टाकता येणार नाही. फोटो त्याच्या मुळ स्थितीत असणे आवश्यक आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com